सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०४ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ३२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गोव्यातील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेत चेंगराचेंगरी; ७ जणांचा मृत्यू, ३० जखमी

पणजी दि.३ (वृत्तसंस्था)- गोव्यातील शिरगाव येथील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जखमी झाले आहेत. शुक्रवारपासून लईराई देवीच्या यात्रेला सुरूवात झाली असून दुसऱ्या दिवशी म्हणजे आज (दि. ३) पहाटे यात्रेला गालबोट लागले.

गोव्यातील शिरगाव या ठिकाणी शुक्रवारी रात्री उशिरा श्री लैराई देवीच्या यात्रेसाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी अचानक चेंगराचेंगरी झाली आणि मोठा गोंधळ उडाला. यामध्ये ६ भाविकांचा मृत्यू झाला आहे. तसेच जखमींना गोवा येथील वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) आणि म्हापसा येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

दरम्यान, लैराई देवीची यात्रा हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. राज्यभरातून आणि परदेशातून देखील भाविक लैराई देवी च्या यात्रेसाठी येत असतात. या उत्सवात भव्य मिरवणूक काढली जाते. मात्र, या वर्षी या यात्रेदरम्यान चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली आणि या घटनेत ६ भाविकांचा मृत्यू झाला आहे.

"शिरगाव येथील श्री लैराई देवीच्या यात्रोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत आम्ही दुःख व्यक्त करतो. या घटनेत ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं त्यांच्या कुटुंबियांप्रति आम्ही मनापासून संवेदना व्यक्त करतो. तसेच या घटनेत जखमी झालेले भाविक लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो", असं गोवा काँग्रेसने एक्सवर (ट्विटर) केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, शिरगाव येथील श्री लैराई देवीच्या यात्रोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत अद्याप स्थानिक प्रशासनाकडून अधिकृतपणे दुजोरा देण्यात आलेला नाही. तसेच चेंगराचेंगरीची घटना कशामुळे घडली? यामागचं कारण काय? याबाबत अद्याप कोणतीही माहिती प्रशासनाकडून अधिकृतपणे देण्यात आलेली नाही. मात्र, प्राथमिक माहितीनुसार अचानक मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यामुळे ही घटना घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, आज सकाळी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळाची पाहणी करून शोक व्यक्त केला. अशा प्रकारची घटना अतिशय दुर्दैवी असून असा प्रकार कधीच घडलेला नाही. त्यामुळे सर्वांनाच धक्का बसला असून शोक झालेला आहे. या दुर्दैवी घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मृतांच्या नातेवाईकांच्या प्रति आमच्या संवेदना आहेत. तसेच कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. जखमींवर तातडीने उपचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व प्रकारचे सहकार्य सरकारतर्फे पुरविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी सांगितले.

घटनास्थळाची जागा अतिशय अरुंद आहे. दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात दुकाने थाटलेली आहेत. तसेच उतरती व चढावामुळे या ठिकाणी लोकांची गैरसोय होत आहे. यापुढे या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी पोलीस अधीक्षक अक्षत कौशल, उपाधीक्षक जिवबा दळवी, गडेकर, देवस्थानचे अध्यक्ष दीनानाथ गावकर व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष दीनानाथ गावकर म्हणाले की, पहाटे धोंडाच्या दोन गटांमध्ये काहीतरी घडले. त्यातच मोठी गर्दी असल्याने काही लोक खाली पडले. त्यानंतर झालेली



चेंगराचेंगरी तसेच एका दुकानांमध्ये अचानक विजेचा शॉक लागल्याने गोंधळ उडूव चेंगराचेंगरी झाली. त्यात ६ जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले. हजारो भाविक असल्याने शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे. या घटनेबद्दल आम्हाला तीव्र दुःख झाले असून मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी आम्ही अधिक कडकपणे उपाययोजना आखण्याच्या दृष्टीने तयारी करू, असेही गावकर यांनी सांगितले.

# दहशतवादी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध आता ठोस आणि निर्णायक कारवाई-पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- दहशतवाद हा मानवतेसाठी धोका आहे. त्यामुळे दहशतवाद आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध ठोस आणि निर्णायक कारवाई करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पुन्हा एकदा पाकिस्तानला ठणकावले. हैदराबाद हाऊस येथे अंगोलाचे अध्यक्ष लॉरेन्को यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर पंतप्रधान मोदी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत बोलत होते.

अंगोलाचे राष्ट्रपती ३८ वर्षांनी भारत दौऱ्यावर आले आहेत, हा एक ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या या भेटीमुळे भारत-अंगोला संबंधांना नवी दिशा मिळत आहेच, शिवाय भारत-आफ्रिका भागीदारीही बळकट होत असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. यावर्षी भारत आणि अंगोला राजनैतिक संबंधांचा ४० वा वर्धापन दिन साजरा करत आहेत. पण आमचे नाते त्यापेक्षा खूप जुने आहे. जेव्हा अंगोला स्वातंत्र्यासाठी लढत होता, तेव्हा भारतही पूर्ण विश्वासाने आणि मैत्रीने उभा राहिल्याचे मोदींनी



सांगितले. अंगोलाच्या सैन्याच्या आधुनिकीकरणाला पाठिंबा देण्यासाठी २०० दशलक्ष डॉलर्सची संरक्षण क्रेडिट लाइन मंजूर करण्यात आल्याची घोषणा मोदी यांनी केली. अंगोलासोबत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, अंतराळ तंत्रज्ञानातील अनुभव शेअर केला जाईल. आरोग्यसेवा, हिरे प्रक्रिया, खते आणि महत्त्वपूर्ण खनिजे या क्षेत्रात दोन्ही देशातील संबंध मजबूत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मोदी यांनी सांगितले.

दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे यावर आमचे एकमत आहे. दहशतवाद्यांवर आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध ठोस आणि निर्णायक कारवाई करण्यास वचनबद्ध असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी यांनी दहशतवादाविरुद्धच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अंगोलाला आफ्रिकन युनियनच्या अध्यक्षपदासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. भारताच्या जी २० अध्यक्षपदाच्या काळात आफ्रिकन युनियनला जी २० चे कायमचे सदस्यत्व मिळाले हे अभिमानाची गोष्ट असल्याचेही मोदी म्हणाले.

# संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी पुन्हा झोडपणार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- सध्या पश्चिमी चक्रावताच्या प्रभावामुळे हिमाचल प्रदेश उत्तराखंड, दिल्ली अशा उत्तरेकडील राज्यांमध्ये तुफान पाऊस सुरू आहे . तर दक्षिणेकडील राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे . महाराष्ट्रात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून आता येत्या चार दिवसात कोकणपट्ट्यासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात अवकाळी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. दरम्यान आज संपूर्ण महाराष्ट्रात सामान्य तापमान होऊन अधिक तापमानाची नोंद झाली. राज्यभरात आता प्रचंड रखरख वाढली आहे .उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती राजस्थान सह मध्य प्रदेश व खालपर्यंत सक्रिय असल्याने महाराष्ट्रात पुढील पाच दिवस अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे . ३-४ व ५ मे रोजी विदर्भासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे इशारे आहेत . त्यानंतर उत्तर महाराष्ट्र मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये अवकाळी पाऊस येणार आहे . गेल्या आठवडाभरापासून विदर्भातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता .

राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे .आजपासून ( ३ एप्रिल ) पुढील पाच दिवस बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे .अवकाळी पावसाची शक्यता असली तरी तापमानाचा पारा ४० च्या पुढेच असल्याची नोंद होत आहे . प्रचंड उकाडा वाढला आहे .नागरिकांना घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढं तापमान नोंदवला जात असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

गेल्या चार ते पाच दिवसांपासून सोलापूर मध्ये तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर आहे . विदर्भात पावसाचा इशारा असला तरी ४२ ते ४५ अंशापर्यंत तापमान टेकलं आहे .मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून कमाल तापमान ४० ते ४५ अंशापर्यंत गेलंय. अनेक भागांमध्ये दुपारच्या वेळी शुकशुकाट झालाय. रस्ते ओस पडले आहेत.

# मलाही मुख्यमंत्री व्हावं वाटतं, पण योग येईना-अजित पवार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यात महिला मुख्यमंत्री व्हावी असे सर्वांना वाटते. पण ते अद्याप शक्य झालेले नाही. त्यानुसार कित्येक वर्षे मलाही मुख्यमंत्री व्हावे वाटत आहे. पण तो योग कुठेही जुळून आलेला नाही, अशी खंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. वरळी येथे आयोजित केलेल्या महिला सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात महिलांना संधी मिळाली पाहिजे. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी चांगला निर्णय घेतला आहे. त्यांच्या कुटुंबांना आधार देण्याचे काम सरकारने केले आहे. अनेक महिलांचे कर्तृत्व राज्याने पाहिले आहे. राजकारणात वैचारिक मतभेद असावेत, पण मनभेद होता कामा नये. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचेही यावेळी भाषण झाले. ते म्हणाले, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या महिलांना सन्मानित करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. तुमच्या पुरस्काराने आमच्या कार्यक्रमाची उंची वाढवली आहे. तुम्ही महाराष्ट्राचे नाव आणि मराठी संस्कृतीची जगभरात ओळख निर्माण केली आहे.

# सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी विश्वास दाभाडे तर उपसभापती पदी संदीप राऊत यांची बिनविरोध निवड

सिल्लोड दि.३ (प्रतिनिधी)- सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी विश्वास दाभाडे तर उपसभापती पदी संदीप राऊत यांची बिनविरोध निवड झाली. सभापती, उपसभापती पदाची घोषणा होताच शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी बाजार समितीच्या आवारात एकच जल्लोष केला. नवनिर्वाचित सभापती विश्वास दाभाडे तसेच उपसभापती संदीप राऊत यांचा माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. शहरातील सेना भवन येथे हा सत्कार सोहळा पार पडला.

सभापती पदासाठी विश्वास दाभाडे यांचा तर उपसभापती पदासाठी संदीप राऊत यांचा एकमेव अर्ज आल्याने पीठासीन अधिकारी तथा सहाय्यक निबंधक संजय गाजूलवाड यांनी दाभाडे व राऊत यांना सभापती - उपसभापती पदी निवड झाल्याचे घोषित केले. त्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विश्वास पाटील तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयातील मुख्य लिपिक पांडुरंग काचोळे यांनी सहकार्य केले. विश्वास दाभाडे यांना सभापती पदासाठी संचालक केशवराव तायडे यांनी सूचक तर नंदकिशोर सहारे यांनी अनुमोदन दिले. तसेच संदीप राऊत यांना उपसभापती पदासाठी दामोधर गव्हाणे यांनी सूचक तर सतीश ताठे यांनी अनुमोदन दिले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या पदाच्या निवडी संदर्भात दि.२८ जानेवारी २०२४ रोजी निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत आ.अब्दुल सत्तार यांच्या जय श्रीराम सहकार विकास पॅनलचे १८ पैकी १८ संचालक निवडणूक आले होते. दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी केशवराव पा. तायडे यांची सभापती पदी तर दारासिंग चव्हाण यांची उपसभापती पदी निवड झाली होती. आ. अब्दुल सत्तार यांनी ठरवून दिलेल्या फार्मूला नुसार दिनांक १७ मार्च २०२५ रोजी केशवराव तायडे व दारासिंग चव्हाण यांनी सभापती, उपसभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्याअनुषंगाने आज सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी त्यांनी उपस्थित सर्व संचालक मंडळाला मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने समनव्यातुन काम करावे असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. सभापती , उपसभापती पदासाठी एक वर्षाचा फार्मूला ठरविण्यात आला यामुळे ५ वर्षात १० जणांना सभापती, उपसभापती पदावर काम करण्यासाठी संधी मिळेल. सिल्लोड तालुक्यातील आमठाणा आणि सोयगाव तालुक्यातील घानेगाव येथे उपबाजार सुरू करण्यासाठी आवश्यक कारवाई करा. बाजार समितीच्या आवारात पायाभूत - मूलभूत सुविधांची कामे करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर, माजी सभापती केशवराव



पा. तायडे, रामदास पालोदकर, श्रीराम पा. महाजन, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, प्रभाकर काळे, देविदास पा. लोखंडे, सुदर्शन अग्रवाल, तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, शहरप्रमुख मनोज झंवर, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार , कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, श्रीरंग पा. साळवे, दारासिंग चव्हाण, दामूअण्णा गव्हाणे, बंडू पा. शिंदे, जयराम चिंचपुरे, सुनील पाटणी, अनुसयाबाई कौतीकराव मोरे, शालिनी नानासाहेब रहाटे, सतीश ताठे, राजाराम पाडळे, रमेश लाठी, भावराव लोखंडे, शेख जावेद यांच्यासह विठ्ठल सपकाळ, राजेंद्र ठोंबरे, संजय डमाळे, सुधाकर पाटील, शेख सलीम हुसेन, रउफ बागवान, प्रशांत क्षीरसागर, कौतीकराव मोरे, राजू गौर, रमेश साळवे, राजूबाबा काळे, नरसिंग चव्हाण, नासेर पठाण, विशाल जाधव, दुर्गेश जैस्वाल, पप्पू जगनाडे, हनिफ मुलतानी, हाजी मोहंमद हनिफ, विश्वास जंजाळ, दिलीप जाधव, पांडुरंग दुधे, सुमनबाई तांगडे, शांताबाई कावले, नाना पांढरे, आशिष कटारिया, ज्ञानेश्वर जाधव आदिंसह शिवसेनेचे पदाधिकारी - कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवानिमित्त गोव्यात 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे भव्य आयोजन!

## संत-महंत, मंत्री यांच्यासह २० हजारांहून अधिक साधक-धर्मनिष्ठ उपस्थित रहाणार!

पणजी (गोवा) दि.३ (वृत्तसंस्था)- समस्त मानवजातीच्या परम कल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव सोहळा आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने गोवा येथे 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. हा महोत्सव १७ ते १९ मे २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या भव्य महोत्सवासाठी देशभरातून अनेक संत-महंत, मुख्यमंत्री, केंद्र आणि राज्य सरकारांतील मंत्री, प्रखर हिंदुत्वनिष्ठ, विचारवंत, अधिवक्ता, उद्योजक, संपादक आदी मान्यवरांसह २० हजारांहून अधिक साधक, धर्मप्रेमी हिंदू उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पणजी येथील हॉटेल मनोशांतीमध्ये झालेल्या या पत्रकार परिषदेला आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. संतोष घोडगे, सांस्कृतिक न्यासाचे श्री जयंत मिरिंगकर, भारत स्वाभिमानाचे श्री. कमलेश बांदेकर, ब्राह्मण महासंघ गोवाचे श्री. राज शर्मा, गोमंतक मंदिर महासंघाचे श्री. जयेश थळी, कुंडई तपोभूमी येथील पद्मनाभ संप्रदायाचे श्री. सुजन नाईक, जगद्गुरु स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचे अनुयायी श्री. अनिल नाईक, तसेच उद्योजक श्री. राघव शेट्टी आणि कदंबाचे माजी महाव्यवस्थापक श्री. संजय घाटे हे उपस्थित होते.




या पत्रकार परिषदेत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे बोधचिन्ह (लोगो) आणि 'धर्मेण जयते राष्ट्रम् ।' या घोषवाक्याचे (टॅगलाईन) अनावरण करण्यात आले.

महोत्सवाविषयी माहिती देतांना श्री. चेतन राजहंस पुढे म्हणाले की, सनातन संस्था गेली २५ वर्षे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गोमंतकाच्या पवित्र भूमीतून, आदर्श आणि संस्कारी पिढी घडवण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रामराज्य-स्वरूप आदर्श राष्ट्र निर्माण करण्यासाठी सामूहिक संकल्प केला जाणार आहे. याद्वारे सर्व आध्यात्मिक संस्था आणि हिंदू संघटना यांच्यातील धर्मबंधुत्व अधिक दृढ होईल. भारतासमोर उभी असलेली आव्हाने पाहिली, तर सनातन धर्मियांचे अस्तित्व आणि सनातन धर्माचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे; म्हणूनच राष्ट्राचे सनातनत्व टिकवून ठेवणे आणि सनातन मानबिंदू अर्थात् गो, गंगा, गायत्री, मंदिरे, वेदादी धर्मग्रंथ यांना पुनर्वैभव प्राप्त करून देणे यांसाठी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित केला आहे. गोव्यात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर तीन दिवसांसाठी संत-महंत, हिंदुत्वनिष्ठ, मान्यवर आणि प्रतिष्ठित यांच्यासह २० हजारांहून अधिक साधक अन् धर्मनिष्ठ एकत्र येत आहेत. हा जणू गोमंतक भूमीतील सनातन धर्मीयांचा भव्य कुंभमेळाच असून येथे धर्म आणि अध्यात्म यांची दिव्य ज्ञानगंगा प्रवाहित होणार आहे.

या महोत्सवात देशभरातून येणारे संत, महंत तथा धर्मगुरु यांच्या संतसभेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्र, धर्म, संस्कृती आणि हिंदु समाज यांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी ते आपल्या ओजस्वी वाणीने मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शनही होणार आहे.

महोत्सवाला आमंत्रित संत-महंत आणि विशेष मान्यवर : 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, पतंजली योगपीठाचे संस्थापक प.पू. योगऋषि स्वामी रामदेवजी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी आणि न्यासाचे महासचिव श्री. चंपत रायजी, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष पू. महंत रविंद्र पुरीजी महाराज, अयोध्या हनुमानगढी येथील पू. महंत राजू दास, श्रीक्षेत्र तपोभूमी (कुंडई, गोवा) पिठाधीश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपादजी नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोदजी सावंत, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, तेलंगाणा येथील भाजपचे आमदार टी. राजासिंह, माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन आदी अनेक मान्यवरांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती धाराशिव, सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

रविवार, ४ मे २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## सामाजिक समतेचा महामेरू : प्रा.रवी सुरवसे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे**

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी जे सामाजिक क्रांतीचे बीज रोवले ते काळाच्या कितीतरी पुढे होते. त्यांनी जातिभेद, वर्णभेद, धार्मिक कर्मकांड, स्त्री-पुरुष असमानता यांसारख्या अनिष्ट प्रथांवर जोरदार हल्ला चढवला.

अंधश्रद्धा ही समाजासाठी घातक असून ती बसवेश्वरांनी मोडून काढत सामाजिक समतेचा महामेरू असल्याचे प्रतिपादन डॉ. आंबेडकर विचार मंचाचे अध्यक्ष प्रा. रवी सुरवसे यांनी केले.

ते म्हणाले की, बसवेश्वरांचे ठाम मत होते. मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया आहे, त्याबाबत 'विटाळ' पाळणे चुकीचे असल्याचे त्यांचे स्पष्ट मत होते. 'अनुभव मंटप' या त्यांच्या संकल्पनेद्वारे विविध जाती-धर्मातील स्त्री-पुरुष एकत्र येऊन आपल्या विचारांची मांडणी करत असत. यामुळे समाजात जागृती निर्माण होत होती आणि वाईट प्रथा-परंपरांवर कठोर प्रहार केला जात असे.

डॉ.आंबेडकर विचार मंचाचे समन्वयक जगदीश जाकते व सचिव डॉ. दिनकर झेंडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला प्रा. अंबादास कळसरे, अमोल गडबडे, राजेंद्र अंगरखे, पी.के. बनसोडे, श्याम नवले, गायकवाड पी.डी., प्रा. गणेश एडके, डॉ. राहुल झेडगे, अरुण कदम, सुनील भातलवंडे, सतीश बनसोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन गायकवाड व्ही.एस.यांनी केले तर आभार धालगडे एस.बी. यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...

### मागासवर्गीय आयोग सदस्य प्रा.डॉ.काळे, तांबे, डॉ.शिखरे ९ मे रोजी जिल्ह्यात

**धाराशिव, दि.३ मे -**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य प्रा.डॉ. गोविंद काळे,प्रा.मच्छिंद्रनाथ तांबे व डॉ.मारुती शिकारे हे ९ रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सकाळी १०:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह येथे १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती या संवर्गास वितरित केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे यांचा आढावा घेतील. त्यानंतर भटक्या जमाती व संवर्गातील भोपे पुजारी यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र बाबत येणाऱ्या अडचणी बाबत बैठक घेतील, दुपारी एक वाजता लोहारा सास्तूर, उमरगा तालुक्यातील येणेगुर, लिंबाळा कलदेव, कोराड,तुळजापूर तालुक्यातील किलज येथील सगर गवंडी समुहाची क्षेत्रफळ पाहणी करतील. सायंकाळी ७:४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. १० मे रोजी सकाळी सात वाजता शासकीय विश्रामगृह धाराशिव इथून पुण्याकडे शासकीय वाहनाने प्रयाण करतील.



### बेंबळी येथे महाराष्ट्र कामगार दिन उत्साहात

**धाराशिव, दि.३ मे -**

श्री रामराव काळे कामगार संघटनेच्या वतीने बेंबळी येथे कामगार दिन उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने झाली. अध्यक्ष नरेंद्र भिमराव वाघमारे यांनी कामगार वर्ग हा देशाचा आधारस्तंभ असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष निलेश बाबासाहेब गवळी, सचिव नंदकुमार चन्नप्पा मानाळे, कोषाध्यक्ष संतोष सिद्धार्थ बनसोडे, कार्यकारी सदस्य साधना नंदकुमार मानाळे, राजकन्या तानाजी मोहिते व राजपाल प्रविण बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### मराठा समाज वधु-वर परिचय मेळाव्या बैठक

**धाराशिव, दि.३ मे -**

तुळजापूर शहरात रविवार दि.२५ मे रोजी होणाऱ्या सकल मराठा वधु-वर परिचय मेळाव्याची संयोजन समितीची बैठक उत्साहात संपन्न झाली. येत्या २५ मे रोजी येथील नळदुर्ग रोडवरील संयोजन समितीचे सदस्य गणेश पुजारी यांच्या श्रीनाथ मंगल कार्यालयात सायंकाळी सकाळी सकल मराठा समाजाच्या वतीने वधु-वर परिचय मेळावा आयोजित केला आहे.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नुतन बसस्थानकाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**



जिल्ह्यातील नागरिकांसाठी आज एक महत्त्वाचा क्षण ठरलेल्या धाराशिवच्या नूतन बसस्थानकाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी महामंडळ) वतीने उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक बसस्थानकाचे उद्घाटन परिवहन मंत्री, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलिस अधिक्षक संजय जाधव, एस.टी महामंडळाच्या उपमहाव्यपस्थापक अमृता ताम्हणकर, विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांच्यासह राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नुतन बसस्थानक इमारतीत संरक्षक भिंत, सेप्टीक टँक आणि ड्रेनेज व्यवस्था, पाणी व्यवस्था, इलेक्ट्रिकम पॅनल रुम, पार्सल ऑफीस, कँटीन, रिझर्वेशन कक्ष, जेनेरिक मेडीकल,

कंट्रोल केबीन आणि पेव्हर ब्लॉक बसविणे इ.गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या नुतन इमारतीत महिलांसाठी हिरकणी कक्ष, सुसज्ज स्वच्छतागृह, अपंगांसाठी स्वच्छतागृह, रॅम्पची व्यवस्था, टॅकटाईल्स, सर्व प्रवाश्यांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय, चौकशी कक्ष, पाण्याची व्यवस्था, कँटीन, चालक-वाहक विश्रांतीगृह असून वाणिज्य आस्थापनेसाठी १ जेनेरिक मेडीकल , ५ दुकाने बांधण्यात आली आहेत.

बसस्थानकात २२ फलाट आहेत. सध्या बसस्थानकातील फरशी काम, प्रसाधनगृहाचे प्लास्टर, पाणीव्यवस्था करणे, बसस्थानकाची रंगरंगोटी करणे, दरवाजे खिडक्या बसविणे, प्रवासी प्रतिक्षालयामध्ये सिलिंग बसविणे इ. कामे पुर्ण झालेली आहेत. तसेच वाहनतळाचे काँक्रीटीकरण एम.आय.डी.सी.मार्फत करण्यात येत आहे.

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे निर्देश
### ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्क अभियान राबविण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे**

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या परिपत्रकानुसार ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्कांबाबत विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

भारत सरकारच्या आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ व संबंधित २०१० मधील नियमांनुसार हा उपक्रम अमलात आणला जात आहे.या अधिनियमाचा मुख्य उद्देश म्हणजे ज्येष्ठ नागरिकांचे वृद्धापकाळात जीवन सुसह्य, सन्मानपूर्वक व तणावमुक्त व्हावे.हा आहे. कलम २ (७) नुसार,ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या नातेवाइकांना (पाल्यांना) वारसा किंवा स्व-अर्जित मालमत्ता हस्तांतरित केली असल्यास,त्या पाळ्यांवर त्यांचे संगोपन करण्याचे दायित्व निश्चित केले गेले आहे. संगोपनास नकार देणाऱ्या पाल्यांविरोधात, कलम ५ नुसार,सक्षम प्राधिकाऱ्यांकडे तक्रार करता येईल. अशा प्रकरणांमध्ये कलम २३ अंतर्गत संबंधित मालमत्तेवर कारवाई होऊ शकते. या परिपत्रकाची वर्तमानपत्रे, सोशल मिडिया, तसेच गावांमध्ये दवंडी देऊन प्रभावी प्रसिद्धी करण्यात यावी,असे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी आदेशित केले आहे.

## तेलबिया उत्पादन वाढीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना 'मूल्य साखळी भागीदारी'ची संधी
### अर्ज करण्याची अंतिम मुदत ६ मे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत सोयाबीन,करडई व सूर्यफूल यासारख्या तेलबिया पिकांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना (ऋझउी) 'मूल्य साखळी भागीदार' म्हणून सहभागी होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेचा उद्देश स्वदेशी खाद्यतेल उत्पादनाला चालना देणे व शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आहे.



अर्ज करण्याची अंतिम मुदत ६ मे २०२५ असून,पात्र कंपन्यांनी आपले संपूर्ण प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत. 'मूल्य साखळी भागीदार' म्हणून पात्र ठरण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना किमान ३ वर्षांपूर्वीची असावी,

कंपनीकडे किमान २०० सदस्य असावेत आणि वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांहून अधिक असावी. तेलबिया उत्पादनाचे स्पष्ट उद्दिष्ट असलेल्या सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाणार आहे.

शासकीय संस्था नसल्यास,खाद्यतेल, तेलबिया व बियाणे क्षेत्रात कार्यरत असलेल्या सार्वजनिक किंवा खाजगी संस्थांनाही भागीदारीची संधी दिली जाणार आहे.

मात्र,त्यांच्यासाठी स्वतंत्र निकष ठरवण्यात आले आहेत.

या भागीदारीतून शेतकरी उत्पादक कंपन्यांना वित्तीय सहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन व बाजारपेठेशी थेट संपर्क मिळण्याची शक्यता असून, स्थानिक उत्पादन साखळी अधिक सक्षम होणार आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी कळविले.

## राष्ट्रवादी कार्यालयात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात

**धाराशिव, दि.३ मे**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा गट) जिल्हा कार्यालय धाराशिव येथे ६५ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, सेवा दल सेल जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव, महीला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, शहर कार्याध्यक्ष मनोज मुदगल,सा.न्याय. सामाजिक न्याय प्रदेश सरचिटणीस सचिन सरवदे, शहर महिलाध्यक्ष सुलोचना जाधव, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष ओबीसी सेल जिल्हा सचिव नारायण तुरूप, रवींद्र पवार जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी विभाग, सौरभ देशमुख, ओंकार राठोड आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेरणा पब्लिक स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन,कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

तेरणा पब्लिक स्कूल, धाराशिव (CBSE) येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन संयुक्तरीत्या मोठ्या उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी शाळेतील सर्व कर्मचारी, कामगार व शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष पद्माकर फंड व सचिव रत्नदीप वाकुरे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून झाली. यानंतर प्राचार्य विलास मोरे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना कामगार दिनाचे महत्त्व सांगितले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले काम प्रामाणिकपणे, मनापासून आणि १००% योगदान देऊन केले पाहिजे, तेव्हाच खऱ्या अर्थाने आनंद, समाधान व सुख प्राप्त होते. त्यांनी विद्यार्थ्यांनाही शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांबद्दल आदर बाळगण्याचे महत्त्व पटवून दिले आणि जीवनात आनंदी व सकारात्मक राहण्यासाठी आवश्यक मूल्यांची मार्गदर्शने दिली.

कार्यक्रमात शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांना फेटा बांधून सन्मानित करण्यात आले व अल्पोपहार



देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या उपक्रमातून कामगार वर्गाविषयी आदर आणि कृतज्ञतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, हा उद्देश ठेवण्यात आला होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रतीक्षा माळी हिने समर्थपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन गणित विभागाचे प्रमुख संतोष राऊत यांनी केले.

यावेळी प्राचार्य विलास बचाटे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महाराष्ट्र दिन, कामगार दिनानिमित्त धाराशिव पंचायत समिती येथे ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त पंचायत समिती कार्यालय, धाराशिव येथे सहाय्यक गटविकास अधिकारी संजय ढाकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर संजय ढाकणे यांनी सर्व उपस्थितांना आणि धाराशिव तालुक्यातील जनतेला महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, हा दिवस आपल्याला राज्य निर्मितीतील योगदान आणि कष्टकरी कामगारांच्या महत्त्वाची आठवण करून देतो. त्यांच्या परिश्रमामुळेच समाजाचा आणि देशाचा विकास शक्य होतो.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व नियोजन पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी केले. देशभक्तीपर गीते, सलामी व राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले होते.

**टि.सी.हरवली आहे**

**स्वाती महादेव जावळे (रा. नागुर ता. लोहारा जि. धाराशिव) या नावाची इयत्ता १२ वी नापास आर्ट शाखेची टि. सी. दि.३०/०४/२०२५ रोजी नागुर ते लोहारा प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावे :- ७६२०१०५८४३**

## तृतीयपंथीय व्यक्ती चालविणार आपले सरकार सेवा केंद्र, पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले उद्घाटन
### जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांची संकल्पना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**



तृतीयपंथीय व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याच्या दिशेने जिल्ह्यात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या जिल्ह्यातील पहिल्या तृतीयपंथी व्यक्तीकडून चालविल्या जाणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात करण्यात आले.

तृतीयपंथीय व्यक्तींना कायदेशीर ओळख, सामाजिक संरक्षण, मानवी हक्कांचे रक्षण आणि शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्याअंतर्गत, जिल्ह्यातील आकाश ऊर्फ देवांशी प्रकाश काकडे या तृतीयपंथीय व्यक्तीस 'आपले सरकार सेवा केंद्र' चालविण्याची संधी देण्यात आली आहे.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत, तसेच तृतीयपंथीय प्रतिनिधी माया दाम (पानसे) आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमामुळे तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींना सशक्तीकरण, स्वावलंबन व सन्मानाने जीवन जगण्याची संधी प्राप्त होणार असून, इतर जिल्ह्यांसाठीही हा एक प्रेरणादायक आदर्श ठरणार आहे.

## पारधी समाजातील अर्जुन चव्हाण झाला डॉक्टर
### यमगरवाडी सेवा प्रकल्पाची यशोगाथा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे**

समाजातील वंचित व भटके-विमुक्त घटकांसाठी कार्यरत असलेल्या भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या यमगरवाडी सेवा प्रकल्पाने आणखी एक यशस्वी विद्यार्थी घडवला आहे.

पारधी समाजातील अर्जुन चव्हाण या विद्यार्थ्याने आयुर्वेद वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर पदवी मिळवली असून, ही बाब संपूर्ण प्रकल्पासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

अर्जुन चव्हाण याचे बालपण अत्यंत खडतर होते. पाचव्या वर्षीच आई-वडिलांचे छत्र हरपल्याने त्याला प्रतिष्ठान संचालित यमगरवाडी प्रकल्पातील निवासी शाळेत दाखल करण्यात आले. लहानपणापासूनच अतिशय हुशार व क्रीडाप्रेमी असलेला अर्जुन अभ्यासात आणि सांस्कृतिक उपक्रमांत सक्रिय होता. त्याने अनेक नाट्य प्रयोगात भाग घेतला तसेच मल्लखांबमध्ये प्रावीण्य मिळवले. विशेष म्हणजे, त्याने दोन वर्षे यमगरवाडीतील विद्यार्थ्यांना मल्लखांबाचे प्रशिक्षणही दिले.

अर्जुनचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण यमगरवाडीत झाले. त्यानंतर त्याने लातूरमध्ये उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करून नाशिक येथील सप्तशृंगी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला.




नुकतेच त्याने यशस्वीरीत्या वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. या संपूर्ण शिक्षण प्रवासात संस्थेने त्याचा शैक्षणिक खर्च उचलला.

फक्त अर्जुनच नव्हे तर त्याच्या कुटुंबातील इतर भावंडांनीही यमगरवाडी प्रकल्पातून प्रेरणा घेतली. त्याची बहीण रेखा चव्हाण हिने GNM कोर्स पूर्ण करून मुंबईतील फोर्टीस हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळवली आहे. दुसरी बहीण शितल हिने DMLT करून तीही मुंबईतील हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे.

लहान भाऊ रामू यानेही नुकतेच DMLT पूर्ण केले आहे. या सर्व भावंडांचे दुसरे घर म्हणजे यमगरवाडीच आहे.

अर्जुनच्या या यशाबद्दल भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवराव काळे, उपाध्यक्ष डॉ.अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचीत, संचालक अशोक संकलेच्या, अभय कुलकर्णी, राजाभाऊ गिजरे, ॲड.जनक पाटील, डॉ.प्रणिता गडेकर, ॲड.प्रदीपसिंग राजपूत, कोषाध्यक्ष नरेश पोटे, तसेच मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे आणि यमगरवाडीतील सर्व कर्मचारी वर्ग यांनी त्याचे अभिनंदन केले. भविष्यात अर्जुनसारख्या अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्याचा आदर्श ठेवावा, असे मत प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आले. यमगरवाडी सेवा प्रकल्प ही या विद्यार्थ्यांसाठी नवसंजीवनी ठरते आहे.

## अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या हस्ते मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

६६ व्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रीमती पाटील यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक गणेश बारगजे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांच्यासह मध्य.प्रशा. इमारतीतील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.




# वार्षिक ॐ जनशांती धर्म सोहळ्याला भक्तिमय, वातावरणात प्रारंभ

## पालकमंत्री संजय शिरसाट यांची उपस्थिती


खुलताबाद दि.३ (प्रतिनिधी)- श्री क्षेत्र वेरूळ येथे परम पूज्य जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व त्यांच्या उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने, वार्षिक ॐ जनशांती धर्म सोहळ्याची सुरुवात अक्षयतृतीया निमित्त अत्यंत भक्तिभावाने व आध्यात्मिक वातावरणात झाली.

२८ एप्रिल ते ५ मे या कालावधीत साजरा होणाऱ्या या पवित्र सोहळ्यात देशभरातून हजारो भाविक भक्तीभावाने सहभागी होत आहेत. या प्रसंगी विविध आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जपअनुष्ठान, वेदविधीने होणारा यज्ञयाग आणि महिला भक्तांसाठी विशेष जप यांचा समावेश आहे.

आजच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री . संजय शिरसाट, शिवसेना जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ व मा महापौर . विकास जैन नंदू घोडले यांनी सोहळ्याला उपस्थित राहून आपली श्रद्धा व्यक्त केली. यावेळी आश्रमातील महंत स्वामी जनेश्वरानंदगिरी महाराज यांच्या हस्ते पालकमंत्री यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ यांचा सन्मान स्वामी परमेश्वरानंदगिरी महाराज यांच्या वतीने करण्यात आला. अन्य मान्यवर पदाधिकाऱ्यांचा सत्कार जय बाबाजी भक्त परिवार चे राजेंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या मनोगतात, "जनार्दन स्वामी महाराजांनी सुरू केलेली गुरुकुल परंपरा, बालसंस्कार, महिला सक्षमीकरण, जप-तप अनुश्ठान, श्रमदान व जनसेवेची कार्ये जगद्गुरू शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रभावीपणे सुरू आहेत. या सेवाकार्याचे जितके कौतुक केले जाईल तेवढे कमीच आहे," असे उद्गार काढले. त्यांनी पुढे नमूद केले की, "राज्याचे उपमुख्यमंत्री . एकनाथ शिंदे यांच्या वतीनेही ह्या सोहळ्याला व जगद्गुरू शांतीगीरीजी महाराज यांना शुभेच्छा संदेश देण्यात आल्या आहेत.जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी सदैव बाबाजींच्या सेवेसाठी तत्पर आहे. आपल्या आदेशाचे पालन एक पाईक म्हणून निष्ठेने करेन," अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

जगद्गुरू शांतिगिरी महाराज यांचे प्रेमळ आशीर्वाद व गूढ आध्यात्मिक प्रवचन भाविकांच्या मनामनांवर गोड ठसा उमटवीत आहे. त्यांनी आपल्या प्रवचनात, "धर्म, शांती व सद्गुण संवर्धनासाठी अशा सोहळ्यांचे अनमोल स्थान आहे," असे सांगितले. या माध्यमातून श्री क्षेत्र वेरूळ हे जनशांतीचे व आध्यात्मिक चेतनेचे केंद्र म्हणून नावारूपास येत आहे. भाविकांनी या दिव्य सोहळ्याचा लाभ घेऊन जीवनात शांती, समाधान व साधनेची गोडी निर्माण करावी, असे आवाहन जगद्गुरू शांतिगिरी महाराजां व जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने सोहळा समितीचे राजेंद्र पवार यांनी केले आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०८) साध्यं-सिद्ध- सिद्धता

विजयाशमीच्या सुमुहुर्तावरसंघ स्थापन झाला तेव्हापासून आजतागायत संघाचे अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक - नैतिक धार्मिक सामाजिक- शारीरिक- राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झालेआहे. उदाः- व्यक्तिगत जीवनातून- समष्टी जीवनाकडे; दास्याकडून- स्वातंत्र्याकडे; निद्रेतून जागृती कडे; दैन्यातून- समृद्धीकडे ; दौर्बल्ल्यातून - सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्यं- सिद्धं- सिद्धता झाली आहे.

आजसुद्धा प्रतिवर्षी विजयादशमीला

ठेवुनी चेहरा हसरा। दुःख सगळे विसरु या. ।या सोनियाचा दिनी ही शपथ घेऊ या।

विः - विजय मिळवूनी षड्रिपूंवरी।
जः- जय मिळवू या मनावरी ।।
याः- यातना कितीही झाल्या तरी।
दः- दररोज एक नियम पाळू या।
शः- शरणागत होऊ श्रीरामचरणी।
मीः- मी पणा दूर सारू या।।
श्रीराम जय राम जयजयराम ।। भारत माता की जय ।।
।। वंदे मातरम् ।। क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

### बंधन बँकेच्या एकूण व्यवसायात वाढ

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- बंधन बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या चौथ्या तिमाहीसाठीचे आपले आर्थिक निकाल जाहीर केले. बँकेच्या एकूण व्यवसायात ११% वाढ झाली असून तो २.८८ लाख कोटी रु. वर पोहोचला आहे. बँकेच्या एकूण ठेवींपैकी रिटेल ठेवींचा वाटा आता सुमारे ६९% इतका आहे. मागील तिमाहीतील ही वाढ बँकेच्या विस्तारित वितरण जाळे, सुधारित कामकाज कार्यक्षमता आणि अनुकूल व्यावसायिक वातावरणामुळे झाली आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये बँकेचा निव्वळ नफा २७४५ कोटी रु. इतका आहे.

### ईवाय-पार्थेनॉन आणि बुकमायशो लाईव्ह चा अहवाल

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- ईवाय-पार्थेनॉन (ईवाय-पी) भारतातील आघाडीची धोरणात्मक सल्लागार संस्था आणि बुकमायशो लाईव्ह बुकमायशो या भारतातील आघाडीच्या मनोरंजन प्लॅटफॉर्मचा लाईव्ह एंटरटेनमेंट अनुभव विभाग यांनी संयुक्तपणे 'भारताची वाढती कॉन्सर्ट इकॉनॉमी : कोल्डप्लेच्या अहमदाबाद टूरने भारताच्या पुढील सांस्कृतिक केंद्रांसाठी आराखडा तयार केला' या शीर्षकाचा अहवाल सादर केला आहे. या अहवालात बुकमायशो लाईव्ह यांनी निर्मित व प्रमोट केलेल्या भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या लाईव्ह एंटरटेनमेंट शो कोल्डप्लेच्या दोन रात्रींच्या 'म्युझिक ऑफ द स्फिअअर्स' कॉन्सर्ट्सचा एकूण परिणाम विशद करण्यात आला आहे.

### कमीलियंट ने दिले सर्वात कठीण परीक्षेला आव्हान

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- कमीलियंट, हा ब्रँड जो त्याच्या ठाम, मजबूत आणि स्टायलिश लगेजसाठी ओळखला जातो, २०१४ मध्ये स्थापनेपासून प्रवास बॅग्जच्या जगात क्रांती घडवत आहे. कमीलियंट म्हणजे बळकटपणा आणि जिवंत डिझाइन यांचं अनोखं संयोग, जो आजच्या प्रवाशांसाठी एक आदर्श पर्याय ठरतो अशा प्रवाशांसाठी जे विश्वसनीयतेसोबत कोणत्याही प्रकारचा सौंदर्यावर तडजोड करत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या प्रवासासाठी तयार केलेलं कमीलियंट लगेज प्रत्येक आव्हानासाठी सज्ज असतं मग तो एखादा ॲडव्हेंचर कॅम्प असो किंवा साहसांनी भरलेली सफर!

### मोटोरोलाकडून भारतात एज ६० प्रो लाँच

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान व इनोव्हेशनमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटोरोला एज ६० प्रो च्या लाँचसह त्यांच्या एज ६० लाइनअपमध्ये आणखी एका सर्वोत्तम स्मार्टफोनची भर केली. या डिवाईसमध्ये सेगमेंटमधील एकमेव ५० एमपी + ५० एमपी + ५०एक्स (टेलिफोटो) ॲडवान्स्ड एआय कॅमेरा, सेगमेंटमधील सर्वात वैयक्तिकृत व संदर्भीय ऑन-डिवाईस एआय अनुभवासह समर्पित एआय की आणि जगातील सर्वोत्तम १.५के ट्रू कलर क्वॉड-कॅमेरा कर्व्ह डिस्प्ले आहे. तसेच, मोटोरोला एज ६० प्रो मध्ये डीएक्सओएमएआरकेचे गोल्ड सर्टिफिकेशन मिळाल्यानंतर जगातील सर्वोच्च बॅटरी रेटिंग - ६००० एमएएच बॅटरीसह ९० वॅट टर्बोपॉवर चार्जिंग आणि १५ वॅट वायरलेस चार्जिंग आहे. या डिवाईसमध्ये अविश्वसनीयरित्या शक्तिशाली व एआय सक्षम मीडियाटेक डायमेन्सिटी ८३५० एक्स्ट्रीम प्रोसेसरची शक्ती आहे.

### महावितरण लकी डिजिटल ग्राहक योजनेचा दुसरा ड्रॉ ७ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा दुसरा लकी ड्रॉ ७ मे २०२५ रोजी ऑनलाईन काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक याप्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्टफोन बक्षीस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्टफोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. पहिला लकी ड्रॉ ७ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात आला असून विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे. यापुढील लकी ड्रॉ जून २०२५ या महिन्यात काढण्यात येणार आहेत.

महावितरणने वीजबिल ऑनलाईन भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढवण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी वीजबिल ऑनलाईन भरणा करणारे सर्व लघुदाब वीजग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीनपेक्षा अधिक वीजबिले ऑनलाईन भरणाऱ्या ग्राहकांना या संधीचा फायदा होणार आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी १ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा ऑनलाईन भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पद्धतीने वीजबिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना वीजबिलाचा ऑनलाईन भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रकमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीजबिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्क्यांहून अधिक वीजग्राहक वीजबिलाचा ऑनलाईन भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढवण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबवण्यात येत आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. वीजबिल ऑनलाईन भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीनपेक्षा जास्त महिने वीजबिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.



### पाणीटंचाईग्रस्त गावांतील पाणी टँकरची रात्री गट विकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड यांनी अचानक भेट देऊन केली तपासणी

सिल्लोड दि.३ (प्रतिनिधी)- दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री सुमारे दुपारी १:३० ते ०४:०० दरम्यान पाणीटंचाईग्रस्त गावात अचानक भेट देऊन पाणी टँकरची तपासणी गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांनी केली ग्रामपंचायत वरूड खुर्द, पिंप्री व खेडी लिहा येथे भेट देऊन टँकर मंजूर खेपाप्रमाणे टँकर गावात जाते का?, पाणी लिटर क्षमता ठरवून दिल्याप्रमाणे तेवढीच आहे का?, पाणी टँकर नेमके गावामध्ये वेळेवर पोहोचते का? पूर्ण खेपा होतात का? पाणी शुद्धीकरण होते का? नियमित ओटी टेस्ट घेतली जाते का? याबाबत भेट देऊन तपासणी करण्यात आली यावेळी सरपंच, पाणीपुरवठा कर्मचारी टँकर चालक, कनिष्ठ सहाय्यक पाणीटंचाई विभाग बबन पगारे व इतर सहकारी उपस्थित होते.

### एमजीएम विद्यापीठाची सीईटी होणार १४, १५ व १६ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- महात्मा गांधी मिशन विद्यापीठाची विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्रता पूर्व परीक्षा दिनांक १४, १५ आणि १६ मे २०२५ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून यासाठी विद्यापीठाच्या www.mgmu.ac.in या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यापीठाकडून तीन प्रकारच्या वेगवेगळ्या प्रवेश पात्रता परीक्षा घेतल्या जातात. यामध्ये मूलभूत आणि उपयोजित विज्ञान , व्यवस्थापन आणि वाणिज्य, सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या आणि आंतरविद्याशाखीय शिक्षण या विद्याशाखांच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश पात्रता परीक्षा बुधवार, दिनांक १४ मे २०२५ रोजी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश पात्रता परीक्षा गुरुवार, दिनांक १५ मे २०२५ रोजी आणि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, प्रयोगकला विद्याशाखा आणि फॅकल्टी ऑफ डिझाईन विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश पात्रता परीक्षा शुक्रवार, दिनांक १६ मे २०२५ रोजी होणार आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजिन्स, रोबोटिक्स, डेटा सायन्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कॅम्पुटर सायन्स, सिव्हिल, मेकॅनिकल अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश होतो. अभियांत्रिकी व्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी होणारी प्रवेश पात्रता दिल्यानंतर पदवीमध्ये बीए, बीकॉम, बी. एससी, बीसीए, बीबीए तर पदव्युत्तर पदवी एमए, एमसीए, एमबीए, एमएससी आदि अभ्यासक्रमांच्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, पत्रकारिता, फॉरेन्सिक सायन्स, बायो टेक्नॉलॉजी, संगीत, चित्रपट, फोटोग्राफी, नाट्यशास्त्र, कॉमर्स, हॉटेल मॅनेजमेंट, फाईन आर्ट, मॅनेजमेंट, बायो इन्फॉर्मेटिक्स, ऍनिमेशन, मॅथेमॅटिक्स, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गांधीयन स्टडीज, लिगल स्टडीज, फार्मास्युटिकल सायन्स इ. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश पात्रता परीक्षा होणार आहे.

एमजीएम विद्यापीठ हे शहराच्या मध्यवर्ती भागात असणारे उच्च शैक्षणिक मूल्य जपत महात्मा गांधी यांच्या विचारांवर चालणारे विद्यापीठ आहे. विद्यापीठात शिकवले जाणारे सर्व अभ्यासक्रम हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार असून विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय आणि बहूविद्याशाखीय शिक्षण उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. विद्यापीठातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. दरवर्षी विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात आलेल्या परिसर मुलाखतींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. या पात्रता परीक्षेसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अधिक माहितीसाठी ९०६७६१२००० या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

# मराठी भाषा विभागाकडून 'अभिजात मराठी' या आगामी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा; उदय सामंत यांच्या हस्ते लोगो लाँच!

## मराठी मनोरंजनासाठी आणि भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय सुरू!

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ यश मिळाल्यामुळे आपल्या मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला.या कार्यक्रमात मा. मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.

ए आय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही आपली मायबोली अभिमानाने उभी राहावी यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे. जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,"मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे. आज मोबाइल हातात आल्यावर आपण दररोज १-२ चित्रपट हेडफोन लावून पाहतो.जर अभिजात मराठी सारखा मराठीचा स्वतंत्र ओटीटी प्लॅटफॉर्म प्रत्येकाच्या हातात असेल, तर त्यातून मराठी भाषेचं संवर्धन, प्रचार आणि उत्तम साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकतं. म्हणूनच हे व्यासपीठ अत्यावश्यक आणि अत्यंत काळानुरूप आहे."

'अभिजात मराठी' हे ओटीटी व्यासपीठ पूर्णपणे मोफत स्वरूपात प्रेक्षकांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर दर्जेदार मराठी चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपटांचा समृद्ध संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळेल. याव्यतिरिक्त, इतर भारतीय भाषांतील निवडक चित्रपट मराठीत डब करून सादर करण्यात येणार आहेत, जेणेकरून भाषेची अडचण न वाटता सर्वांना दर्जेदार आशयाचा आनंद घेता येईल. तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आशयासोबत मराठी सबटायटल्स देण्यात येणार आहेत, ज्यामुळे जागतिक कंटेंटही मायबोलीत अनुभवता येणार आहे.

अभिजात मराठी चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले "'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ आहे. ही भाषा जगायची आहे, टिकवायची आहे म्हणून हे व्यासपीठ आम्ही निर्माण करतोय !"



'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार असून, तो १,००० निवडक प्रेक्षकांसाठी खास प्रिव्ह्यू स्वरूपात असेल. त्यानंतर, ऑक्टोबर २०२५ मध्ये मराठी भाषा आठवड्याच्या निमित्ताने या प्लॅटफॉर्मचा अधिकृत भव्य लॉन्च करण्यात येणार आहे. हा टप्पा मराठी प्रेक्षकांसाठी आणि संपूर्ण इंडस्ट्रीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरेल.

सर्व प्रकारच्या मराठी कंटेंटसाठी खुले आवाहन: 'अभिजात मराठी' या व्यासपीठावर प्रसारित होण्यासाठी आपल्या दर्जेदार मराठी कलाकृतींचं स्वागत करण्यात येत आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपट यांसारख्या विविध प्रकारच्या कंटेंटसाठी खुले असून, नवोदित आणि अनुभवी निर्मात्यांना एक नवी संधी देण्यासाठी तयार आहे.

कंटेंट पाठवण्यासाठी तुम्ही खाली दिलेल्या ई-मेल वर संपर्क करू शकता टीप कृपया तुमचं संपूर्ण प्रोफाइल व कंटेंट लिंक्ससहित सबमिट करावं. "आपली भाषा, आपली संस्कृती आणि आपला अभिमान 'अभिजात मराठी'सोबत आता संपूर्ण जगभर झळकणार!" १ मे २०२५ रोजी या उपक्रमाची केवळ अधिकृत घोषणा करण्यात आली आहे मात्र लवकरच 'अभिजात मराठी' ओटीटी प्लॅटफॉर्म आपल्या मायबोलीसाठी एक भक्कम जागतिक व्यासपीठ ठरेल, जिथून मराठीची श्रीमंती, संस्कृती आणि प्रतिभा अखंड जगभर झळकणार आहे!

### पैठण मोक्ष घाटावर कावळ्याच्या शोधात गेलेल्या भाविकाचा मृत्यू.

पैठण दि.३ (प्रतिनिधी)- मोक्षभूमी दक्षिण काशीत नाथ मंदिर मागील गोदावरी मोक्ष घाटावर आपल्या परिवारातील व्यक्तीचा दहावा ( रक्षा विसर्जन आणि पिंडदान ) करण्यासाठी आलेल्या सिल्लोड तालुक्यातील एका व्यक्तीचा कावळ्याला घास देण्यासाठी त्याचा शोध घेत असतांना उष्माघाताने भोवळ येऊन पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून भाविकांचे आरोग्य पाहता दशक्रिया विधी करणाऱ्या पुरोहितांनी पावसाळ्यापर्यंत दुपारी १२ वाजेपर्यंतच दशक्रिया विधी करून आपली व यजमानांची काळजी घेण्याचे आवाहन पुरोहित संघाचे अध्यक्ष योगेश धर्माधिकारी यांनी केले आहे. राज्यात उच्च तापमानाने सरासरी गाठली असतांना पैठणला सुद्धा एप्रिल प्रमाणे मे हिट चे दैनंदिन तापमान हे ४२ ते ४४ डिग्री सेल्सियस ईतक्या प्रमाणात वाढत आहे. ज्याने दुपारच्या वेळी रस्ते सामसूम होऊन बाजारपेठेत शुकशुकाट पसरला आहे. परंतु मोक्षभूमी असलेल्या पैठण नगरीत दशक्रिया विधी करण्यासाठी येणारे भाविक याला अपवाद ठरतात अगदी कडक उन्हात ही दशक्रिया विधी केला जात आहे. गुरुवारी १ मे रोजी दुपारी मोक्षघाटावर दशक्रिया विधीची प्रक्रिया आटपून विधीत आलेल्या सिल्लोड तालुक्यातील एका परिवाराला कावळ्याला घास देण्यासाठी सांगण्यात आले. यानंतर या परिवारातील लोकांनी बंद असलेल्या पंप हाऊस ठिकाणी कावळ्याचा शोध घेत असतांना त्याच परिवारातील एक व्यक्ती उष्माघाताने चक्कर येऊन पडला असता त्याला शहरातील खासगी डदवाखान्यात नेण्यात आले.आणि अति उष्माघाताने या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे. या घटनेने पुरोहित आणि भाविक वर्गात चिंतेचे वातावरण पसरले असून तीव्र उन्हामुळे भाविकांचे आरोग्य लक्षात घेता पावसाळा लागेपर्यंत पुरोहित आणि भाविकांनी परामर्ष करून दुपारी १२ वाजेपर्यंत दशक्रिया विधी करण्याचा निर्धार घेण्यात येणार आहे. यासाठी पुरोहित संघाचे अध्यक्ष योगेश धर्माधिकारी यांनी पुरोहित व भाविकांना दुपारी १२ वाजेपर्यंत दशक्रिया विधी करण्याचे आवाहन केले आहे.

पंजाब एण्ड सिंध बैंक
PUNJAB & SIND BANK
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

जागेची आवश्यकता

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| जालना शहर, जि. जालना, महाराष्ट्र | १२०० चौरस फूट पर्यंत |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख २६ मे २०२५. आहे.

अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट www.punjabandsindbank.co.in ला भेट द्या.

आंचलिक प्रबंधक, मुंबई

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# संधी, क्षमता आणि सिद्धतेची कसोटी

काश्मीरच्या पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर देशात साहजिकपणे उसळलेली संतापाची लाट, जनतेमध्ये उफाळलेली बदल्याची भावना आणि काहीही करून आता निर्णायक कारवाई करून पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याच्या भावनेतून वाढत असलेला सामाजिक दबाव यामुळे आता युद्ध हाच एकमेव पर्याय असल्याची चर्चा होत असताना अचानक केंद्रातील मोदी सरकारने देशासमोरील एका जिवंत प्रश्नाला हात घातला. आगामी जनगणनेत जातिनिहाय जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहारविषयक समितीच्या बैठकीत बुधवार, ३० एप्रिल रोजी घेण्यात आला.

सन १९३१ नंतर प्रथमच आणि स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशात जातिनिहाय जनगणना करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे निर्विवाद श्रेय मोदी सरकारच्या खात्यात जमा झाले आहे. कदाचित त्यामुळे आपल्याच दबावापुढे मोदी सरकार झुकले, असा नवा भ्रम माजविण्याचा प्रयत्न काँग्रेस व अन्य काही भाजपाविरोधी पक्षांकडून आता सुरू झाला आहे. मुळात या देशातील समाजघटक, जे जाती-जातींमध्ये विखुरले गेले आहेत; ज्यामुळे सामाजिक वर्गविग्रह निर्माण होऊन विषमतेची बीजे फोफावली आहेत, त्या सर्व समाजघटकांना समानता, समरसतेच्या सूत्रात बांधून एकत्र आणावयाचे असेल, तर जातिभेदाच्या दऱ्या बुजवून टाकल्या पाहिजेत, असा आग्रह गेल्या काही शतकांपासून ज्या देशातील समाजसुधारकांनी केला. त्या समाजसुधारकांना या नव्या निर्णयामुळे काय वाटले असते, हा प्रश्न आता बाजूला ठेवावा लागेल. जातिनिहाय जनगणना ही एक अटळ बाब ठरल्याचे वास्तव मोदी सरकारने स्वीकारले, हे समंजसपणाचे लक्षण म्हणावे लागेल. या निर्णयावर मोदी सरकारला मिळणारा सर्वपक्षीय पाठिंबा आणि समाजाच्या सर्व स्तरांतून जातिनिहाय जनगणनेचे होत असलेले समर्थन पाहता या निर्णयाची कार्यवाही आता फार कालापव्यय न होता तातडीने सुरू व्हावी, ही यापुढील सामाजिक अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी मोदी सरकारवर असेल. जातिनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यासाठी मोदी सरकारने हीच वेळ का निवडली, या शंकेने सध्या अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. उभ्या देशात युद्धज्वर उसळलेला असताना या निर्णयाची चर्चा व्हावी आणि पहलगाम हल्ल्यानंतरच्या कारवाईच्या अपेक्षांची तीव्रता कमी व्हावी, यासाठीच ही वेळ निवडल्याचा जावईशोधही लावला गेला. पण पहलगाम हल्ल्यानंतरच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि सीमेपलीकडील राजकीय परिणामांबाबत एका बाजूला वेगवेगळ्या कारवाया सुरूच आहेत, त्यासाठी सरकारच्या सर्व संबंधित यंत्रणा आपली सारी नीतिकौशल्ये पणाला लावून योग्य संधी आणि वेळ साधण्यासाठी सारी गणिते बांधत आहेत, याची खात्री अनेकांना असल्यामुळे, जातिनिहाय जनगणनेचा देशाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा याच काळात कार्यवाहीकरिता ऐरणीवर आणून देशांतर्गत आणि देशापलीकडील सर्व समस्यांना न्याय देण्याची मोदी सरकारची भूमिका समजून घ्यायला हवी.

गेल्या अनेक दशकांपासून अनेक राजकीय पक्ष या जातिनिहाय जनगणनेचा मुद्दा ठासून मांडत आले आहेत. काही पक्षांनी आपल्या सत्ताकाळात राज्यनिहाय जाती जनगणना केल्याही आहेत; कदाचित आकडेवारीतील अपुरेपणामुळे असेल किंवा राजकीय लाभाच्या गणितास पूरक निष्कर्ष निघत नसल्यामुळे असेल, त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नाही. या देशातील ज्या समाजघटकांचे लोकसंख्येनुसार संख्याबळ अधिक आहे, त्यांना देशातील सर्व संसाधनांचा आणि सुविधांचा लाभ त्यानुसार मिळावयास हवा, त्यांच्या लोकसंख्येनुसार संसाधनांवरील व लाभाच्या निर्णयांवरील त्यांच्या हक्काचा प्राधान्यक्रम ठरवायला हवा, ही त्यामागची भूमिका सर्वमान्य अशीच आहे. मोदी यांच्या भारतीय जनता पक्षाने सत्तेवर असताना आणि विरोधात असतानाही या भूमिकेचे जोरदार समर्थन केले होते. भारतीय जनता पार्टीचे खासदार म्हणून पहिल्यांदाच लोकसभेत दाखल झालेले महाराष्ट्रातील भाजपा नेते गोपीनाथ मुंडे यांनी त्यांच्या कार्यकाळात लोकसभेच्या सदनात या मागणीवर आग्रही भर दिला होता. अशी जनगणना करण्याचा मनसुबा २०११ मध्ये तत्कालीन काँग्रेस सरकारचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी जाहीर केला, तेव्हा काँग्रेसमध्ये फारशी सहमती नसतानादेखील, भाजपाच्या सुषमा स्वराज यांनी या कार्यवाहीस संपूर्ण सहमती व सहकार्य देण्याची लेखी ग्वाही पंतप्रधानांस दिली होती. २०११ मध्ये जातनिहाय जनगणना करण्यात आली होती, पण त्या जनगणनेतील आकडेवारी कधी उघड करण्यात आली नव्हती. त्यानंतर २०१८ मध्ये भाजपाचे राजनाथ सिंह यांनी जातिनिहाय जनगणना करण्याकरिता पक्षाची अनुकूलता स्पष्ट केली होती. राज्यांना तसे अधिकार देण्याचा प्रस्तावही भाजपाच्याच पुढाकाराने संमत झाला होता, हा इतिहास फार जुना नाही. त्यामुळे आता श्रेयाच्या लढाईत कोणीही कितीही तलवारी परजल्या, तरी कार्यवाहीच्या मुद्यावर या सरकारलाच निर्विवाद श्रेयाचे धनी ठरवावे लागेल, याची जाणीवही या पक्षांना आहे. हा मुद्दा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा करण्यात प्रत्येक राजकीय पक्षाचा निवडणुकीच्या राजकारणाचा स्वार्थ आता लपून राहिलेला नाही. कारण जाहीर सभा-संमेलनांत जातिनिर्मूलनाचे कितीही नारे दिले जात असले, तरी जातीच्या आधारावरच मतदारसंघांची, उमेदवारीची आणि मतपेढ्यांची गणिते बांधली जातील, हे या देशाच्या निवडणूक राजनीतीचे कडवट वास्तव आहे. जाहीर सभा-संमेलनांतून जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाची भाषणे करणाऱ्या अनेक नेत्यांनी जातिआधारित भावनांचा गैरफायदा घेत जाती-जातींमध्ये फूट पाडणारे राजकीय प्रयोग केल्याची अनेक उदाहरणे आसपास सातत्याने सहज दिसतही असतात. जात हे सत्तासंपादनाचे शक्तिशाली साधन असेल, तर जातीचे संख्याबळ कधीच सत्तेपर्यंत पोहोचू शकणार नाही अशा भावनेने काही समाजसमूहांत उदासीनताही दिसून येते. म्हणूनच संधींचे आणि लाभांचेही न्याय्य वाटप हा पर्याय यावरील उपाय ठरत असेल, तर त्यासाठी मागे जाऊन जुन्या आरंभबिंदूपासून सुरुवात करावयास हवी, हीच आजची गरज ठरते. एका दृष्टीने हा प्रकार म्हणजे 'पुनश्च हरिओम' म्हणण्यासारखा ठरेलही, पण वर्तमानातील समाजभान ज्या दिशेने झुकत आहे, ते पुन्हा योग्य स्थानी आणून ठेवण्याकरिता तो गरजेचा असल्याचे वास्तव स्वीकारावे लागेल. सामान्य माणसाच्या दृष्टीने किंवा सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने जातव्यवस्था ही समाजात दरी निर्माण करणारी, काही ठरावीक समूहांच्या वर्चस्वास प्रेरणा देणारी आणि काही वर्गांच्या सामाजिक उत्कर्षात अडथळे आणणारी व्यवस्था असल्याने ती व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने अन्यायकारच आहे आणि विकासाची सर्व फळे समाजाच्या सर्व घटकांस समान प्रमाणात चाखता यावी, अशी भावना असेल तर ही व्यवस्था मोडीतच काढली पाहिजे, असा गेल्या शतकापासून अधिक काळापासून सुरू असलेला मतप्रवाह सामाजिक मानसिकतेत मूळ धरू पाहात असतानाच पुन्हा एकदा काळाचे काटे उलटे फिरवून त्याच व्यवस्थेस बळकटी देण्याचा तर हा प्रकार ठरणार नाही ना, अशा शंका काहींच्या मनात घर करू लागल्या आहेत. त्या अनाठायी आहेत, असेही म्हणता येणार नाही. पण जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्याआधी सर्व जातिसमूहांना सामाजिकदृष्ट्या एका स्तरावर आणून ठेवणे ही त्याआधीची गरज आहे. कोणत्याही शर्यतीसाठी उभे असलेल्या सर्व स्पर्धकांना सुरुवातीस एका रेषेवरच उभे केले जाते. काही जण पुढे, काही जणांना मागे ठेवून शर्यत सुरू केल्यास, ज्यांना सुरुवातीलाच पुढे उभे केले आहे, त्यांनाच जिंकण्याची संधी अधिक असेल, त्यामुळे मागे उभे असलेल्यांना अगोदर एका रेषेवर आणले पाहिजे आणि मगच शर्यत सुरू केली पाहिजे, हे सामाजिक न्यायाचे तत्त्व पाळावयाचे असेल, तर मागे असलेल्या वर्गास शर्यतीत सहभागी होण्याची संधी देण्याआधी त्यांच्यामध्ये तशी क्षमता निर्माण करावीच लागेल. जातिनिहाय जनगणना करून, मागच्या रेषेवर उभ्या असलेल्या समाजघटकांना न्याय्य संधी बहाल केल्यास ती क्षमता निर्माण होईल आणि त्यानंतरची स्पर्धा निकोप असेल. संधींच्या समान वाटपाचे सूत्र म्हणून उचललेल्या या पहिल्या पावलाकडे राजकारणापलीकडे जाऊन समंजसपणे पाहावयास हवे, ते त्यामुळेच!

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# भारतातल्या 'पाकिस्तान'चं काय करायचं?

पहलगाम हल्ल्यानंतर ज्यावेळी मोदी सरकारने भारतातील पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडून जाण्याचे आदेश दिले तेव्हा अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. भारतात अनेक पाकिस्तानी नागरिक अनधिकृतरीत्या राहत आहेत. भारतीय मुस्लिम महिला पाकिस्तानी पुरुषांशी निकाह करतात आणि राहतात मात्र भारतात. त्यांची मुले भारतातच लहानाची मोठी होतात. आपल्या भारतात घुसखोरी होते हे माहीत होतं; पण पाकिस्तानी पुरुषांशी विकाह करून भारतात राहण्याचं व मुलांना भारतातच वाढवण्याचं कटकारस्थान या हल्ल्यानंतर उघडे झाले आहे. आता यात कुणाला कटकारस्थान वाटत नसेल तर आपल्याला त्याच्या बुद्धीची कीव करावी लागेल. भारतात मुस्लिमांची जी लोकसंख्या वाढली आहे ती केवळ नैसर्गिक पद्धतीने वाढली नसून अशाप्रकारे कटकारस्थान करून वाढलेली आहे. लक्षात घ्या, ज्या मुलांचे अब्बू हे पाकिस्तानी आहेत, ती मुले भारतात वाढली तर काय होईल? ती मुले मनाने भारतीय बनतील का? नव्हे, ती मनाने पाकिस्तानी बनतील. आपण १९४७ साली कोणतेही नियोजन न करता फाळणी करून किती मोठी चूक केली, हे आता आपल्या लक्षात येत आहे. फाळणी करताना लोकसंख्येची अदलाबदल केली नाही. ज्येष्ठत्व स्वीकारून पाकिस्तानवर वचक ठेवला नाही. त्यांची शक्ती आपल्यापेक्षा सर्वार्थाने कमी; तरी ते आपल्याकडे इतकी वर्षे डोळे वटारत होते. त्यांनी डोळे वटारले की, आपण मान खाली घालून निघून जायचो. ही आपली राजकीय स्थिती होती. मात्र, २०१४ नंतर परिस्थिती हळूहळू बदलू लागली. आज आपण त्यांच्याकडे डोळे वटारून पाहतो. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय जनतेला असं वाटत आहे की, युद्ध झालं पाहिजे. मात्र, युद्ध हे खर्चिक असतं. त्याचे परिणाम काही वर्षे भोगावे लागतात. आपलं सरकार आणि सैन्य योग्य तो धडा शिकवेलंच पाकिस्तानला. पण मला चिंता सतावतेय ती म्हणजे भारतात असलेल्या पाकिस्तानचं काय करायचं?

जाहिरात विश्वातले सम्राट व नाटककार भरत दाभोळकर यांनी त्यांच्या फेसबुकवर एक धक्कादायक माहिती दिली आहे. त्यांच्या गुजराती नाटकाच्या रिहर्सलला एक मुलगी कांदिवलीवरून येत होती. तिचा नवरा तिला ओशिवरा येथे सोडायला आला. जेव्हा ते मालाडला पोहोचले तेव्हा एका टँकर किंवा मोठ्या टेम्पोने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. पोलिस स्टेशनमध्ये त्यांना कळले की, ड्रायव्हरकडे ड्रायव्हिंग लायसन्स नव्हते. त्याने त्याचे नाव 'अफझल' असल्याचे सांगितले, पण त्याच्या आधारकार्डवर त्याचे नाव 'सैफ अली' होते. नंतर कळलं की, तो बांगलादेशी घुसखोर आहे.



पोलिसांनी त्याच्या मालकाशी संपर्क साधला तेव्हा तोदेखील बांगलादेशी घुसखोर निघाला. हा भारतात राहून व्यवसाय करतोय. विचार करा, आपण ज्या मुस्लिम व्यक्तीकडून खरेदी करतो, त्याच्याशी आपला संबंध येतो ती मुस्लिम व्यक्ती मूळची भारतीय आहे की बांगलादेशी व पाकिस्तानी घुसखोर आहे, हेही आपल्याला माहित नसतं. उद्या जर काही वाद झाला, खटके उडाले तर आपलं काय होईल, याची कल्पनाही करवत नाही. याचा अर्थ आपण एका टाईम बॉम्बवर उभे आहोत. हा बॉम्ब कधी फुटेल आणि कधी आपल्या चिंधड्या उडतील, हे आपल्याला कळणारसुद्धा नाही. हे घुसखोर मुस्लिमबहुल विभागात राहतात. म्हणजे या लोकांना आश्रय देणारे स्थानिक आहेत. भारतात होणाऱ्या लहानसहान दंगली या चाचण्या आहेत. ते टेस्ट करीत आहेत की, उद्या जर मोठी दंगल करायची झाल्यास हिंदूंची, पोलिसांची आणि सैन्याची तयारी काय आहे? ही शक्यता नाकारता येत नाही. त्यात हिंदू अजूनही 'स्टॉकहोम सिंड्रोम' या विकारातून मुक्त झालेले नाहीत. स्टॉकहोम सिंड्रोम म्हणजे अत्याचार करणाऱ्याबाबत आपल्या मनात निर्माण झालेली आपुलकीची भावना, प्रेम. हा विकार आपला घात करत आहे. पहलगाम हल्ल्यातील एका पीडितेने स्थानिक काश्मिरींबाबत असं म्हटलं की, 'मी माझे वडील गमावले, पण मला दोन भाऊ भेटले.' कुणीतरी सोशल मीडियावर फोटो व्हायरल केला. त्यात असं लिहिलं होतं की, पाकिस्तानने माझ्या वडिलांचा जीव घेतला नसून युद्धाने त्यांचा बळी घेतला आहे. या हल्ल्यात हुतात्मा झालेले नेव्ही अधिकारी विनय नरवाल यांच्या पत्नीने असं विधान केलं की, 'लोक मुस्लिम आणि काश्मिरींच्या विरोधात जात आहेत ते आम्हाला नकोय. अर्थात आम्हाला न्याय हवाय.' ही सर्व लक्षणे स्टॉकहोम सिंड्रोमची आहेत. कोणत्याही आजाराची, विकाराची सुरुवातीची काही लक्षणे असतात व तो आजार वाढला की, काही वेगळी लक्षणे दिसू लागतात. आता स्टॉकहोम सिंड्रोमची जी लक्षणे दिसत आहेत, ती तीव्र आणि गंभीर आहेत. यावर उपचार कसा करायचा हे आपल्याला माहिती नाही.

आपण आज पाकिस्तानसोबत युद्ध करायच्या गोष्टी करीत आहोत. जर युद्ध झालं तर आपण जिंकूही. पण पाकपेक्षा मोठी समस्या भारतात निर्माण होणाऱ्या पाकिस्तानची आहे. फाळणी व्हायच्या आधी सर सय्यद अहमद खान यांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. आज आपण पुन्हा एकदा त्या समीप जात आहोत. म्हणून पाकिस्तानशी आपण युद्ध करू तेव्हा करू. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे दोन गोष्टींवर आपल्याला उपाय शोधून काढावा लागणार आहे.

१) स्टॉकहोम सिंड्रोमने ग्रस्त हिंदूंवर उपचार करणे

२) भारतात निर्माण होणाऱ्या पाकिस्तानचा बंदोबस्त करणे.

या आपल्या समोरच्या दोन मोठ्या अंतर्गत समस्या आहेत. यावर केवळ सरकारनेच नव्हे, तर सज्जन हिंदूंनी काम करण्याची गरज आहे. ज्या महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी लग्न केलं आहे, त्यांना कोणतीही दयामाया न दाखवता त्यांच्या मुलांसोबत भारत सोडायला लावलं पाहिजे. आपण भारतात भारताचे शत्रू निर्माण नाही करू शकत. हे आपल्याला परवडणारं नाही तसेच नागरिक म्हणून बांगलादेशी व पाकिस्तानी घुसखोर आणि घुसखोरांना शरण देणाऱ्यांकडून काहीही खरेदी करू नये. आपण त्यांचे ग्राहक होता कामा नये. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर राज्यांतील त्या त्या उत्सवांद्वारे हिंदूंमधील स्टॉकहोम सिंड्रोमवर उपचार करणारे कार्यक्रम राबविले पाहिजेत. हिंदूंना समजावून सांगितलं पाहिजे की, हा तुमचा चांगूलपणा नसून ही सद्गुणविकृती आहे. ही आत्महत्या आहे. हिंदूंनी आपल्याच हिंदू बांधवांबद्दल द्वेष पसरवणं सोडलं पाहिजे. हिंदू, शीख, बौद्ध, जैन आणि सर्व संप्रदाय व पंथ आपण सारे हिंदू बंधू आहोत. आता वेळ आली आहे हातात हात घालून चालण्याची. समरस होण्याची... सामाजिक समरसता हे खूप मोठे उत्तर ठरणार आहे... खूप मोठी क्रांती ठरणार आहे!

writerjayeshmestry@gmail.com

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# पवार, ठाकरेंचे मौन का?

केंद्र सरकारने सामाजिक-आर्थिक जात जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर काँग्रेसकडून वरिष्ठ स्तरावर स्वागत करण्यात आले. मात्र, काँग्रेसचे सहकारी असलेले राज्य स्तरावरील महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख शरद पवार, उद्धव ठाकरे यावर काही का बोलले नाही? यांचं ओबीसींच्या प्रश्नावर एवढं सोयीस्कर मौन का? काय समस्या आहे यांची? २०११ साली सोनिया गांधींच्या नेतृत्वातील युपीए सरकारच्या काळात शरद पवार केंद्रीय मंत्री असताना सामाजिक सर्वेक्षण झाले होते. त्याला लागूनच जातींची माहितीदेखील गोळा करण्यात आली होती. एकप्रकारे जातनिहाय जनगणनाच झाली होती. पण ती माहिती काँग्रेस सरकारने जाहीर केली नाही. त्याच्याबद्दल राहुल गांधी आणि शरद पवारांचं काय म्हणणं आहे? जेव्हा यांच्याकडे संधी होती, तेव्हा चुकीचं आणि घाईघाईत बोगस काम काँग्रेसने केलं होतं आणि आता मोदीजींना शहाणपणा शिकवायला निघाले आहेत, काँग्रेसचे युवराज आणि त्यांच्या मांडीवर बसलेले काही लोक. याचा सरळ अर्थ असा आहे की, काँग्रेस आणि त्याचे सहकारी कधीही ओबीसींच्या प्रश्नांबाबत गंभीर नव्हते. जाती-पातीचं राजकारण करून आपली राजकीय पोळी शेकण्याचं काम आजवर ही मंडळी करत आली. याचं उत्तम उदाहरण म्हणजे आठ-नऊ महिन्यांपूर्वी मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर राज्य सरकारने अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी एक सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. त्या बैठकीला येण्याचे सर्व विरोधकांनी मान्य केले होते. प्रत्यक्षात एकाही विरोधी पक्षाने हजेरी लावली नाही. यावरूनच विरोधकांची कुटिल मानसिकता लक्षात येते. यावेळी केंद्र सरकारने तब्बल ९४ वर्षांनंतर जातिनिहाय जनगणना करण्याचा एवढा मोठा निर्णय जाहीर केला. पण धार्मिक आणि जातीय रंग देऊन राजकारण करणाऱ्या या मंडळीचे मनसुबे आता फस्त होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे यावेळी निर्णयाचे स्वागत करता येत नाही आणि विरोध केला तर छुपा अजेंडा उघडा पडेल, अशाप्रकारे 'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशी स्थिती यांची झालेली दिसते.



काँग्रेसकडून फटाक्यांची आतषबाजी करून हा निर्णय राहुल गांधींचा विजय असल्याचे आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाकडून हा आपला आणि लालूप्रसादांच्या प्रयत्नांचा विजय असल्याचे सांगत किमान या निर्णयाचे स्वागत तरी केले. पण महाराष्ट्रात तोंडदेखले का होईना, या निर्णयाचे स्वागत करण्याचे औदार्यदेखील येथील संधिसाधू राजकीय नेतेमंडळी दाखवू शकली नाही. नाही त्या विषयात नाक खुपसणारे ठाकरे आणि गँग आता या सामाजिक कार्यात मात्र मौन बाळगून बसले आहेत. राज्यातले ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पहलगामसारख्या अतिसंवेदनशील विषयावर असंवेदनशीलच का होईना, पण वक्तव्य केले. मात्र, बहुजनांच्या विषयावर ते मूग गिळून बसले आहेत. एवढेच नव्हे, तर गद्दे, टिकली, साडी, पदर यांसारख्या विषयात हिरीरीने तोंड मारणाऱ्या सुप्रियाताईदेखील कुठेही दिसल्या नाहीत. त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी ही तिसरी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकावर भडकणारे 'हिंदू आहोत हिंदी नाही' म्हणत तत्काळ प्रतिक्रिया देणाऱ्या राज ठाकरेंना आता यावेळी केंद्र सरकारने हिंदू, मराठी ओबीसींच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावर तोंड उघडायला काय झालं असेल बरं? का देशातला आणि महाराष्ट्रातला ओबीसी हिंदू किंवा मराठी नाहीत?

मुळात जातीय जनगणना करण्यास भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विरोध असल्याचा दुष्प्रचार करण्यात सारे विरोधक नेहमीच एक पाऊल पुढे राहिले आहेत. प्रत्यक्षात १९७८ मध्ये जनता पार्टीच्या समर्थनाने मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वातील पहिले गैरकाँग्रेसी सरकार देशात आले. त्या सरकारने मंडल आयोगाची स्थापना केली होती. १९८० मध्ये आयोगाने आपला अहवाल सरकारला सादर केला. मात्र, दुर्दैवाने तोपर्यंत देशात काँग्रेसचे सरकार आले होते. यातली महत्त्वाची बाब म्हणजे काँग्रेसने यावर कुठलीही कारवाई शेवटपर्यंत केली नाही. त्यानंतर इंदिरा गांधींनी 'ना जात पर ना पात पर, इंदिराजी की बात पर, मुहर लगेगी हाथ पर'चा नाराच दिला होता. त्यानंतर राजीव गांधींनीदेखील याचीच री ओढली. आणि या सर्व प्रकाराच्या फार पूर्वी म्हणजे देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पहिल्यांदा जनगणना करण्याचा निर्णय १९५१ मध्ये झाला. तेव्हा जातनिहाय जनगणना करण्याचा विरोध स्वतः जवाहरलाल नेहरूंनी केला होता. जातनिहाय गणना करू नये या नेहरूंच्या विरोधामुळे २०११ पर्यंत अशा पद्धतीने जातीय गणना झालीच नाही. त्यावेळी राममनोहर लोहिया यांनी आम्ही ६० टक्के असल्याने आम्हाला तेवढा वाटा सत्ता आणि संपत्तीत मिळाला पाहिजे, अशी मागणी लावून धरली होती. मात्र, काँग्रेसचं राजकीय मॉडल हे ओबीसी विरोधी होतं. यांचं महाराष्ट्रातील राजकारण दलित १३ टक्के, मुस्लिम १२ टक्के आणि मराठा ३२ टक्के असे मिळून ५७ टक्क्यांचे होतं. असंच विविध राज्यात यांनी राजकारण केलं. उत्तर प्रदेशात दलित, मुस्लिम, ब्राह्मण, तसंच कुठे दलित, मुस्लिम, जाट, कुठे दलित, मुस्लिम, रेड्डी अशा पद्धतीचं बेरजेचं राजकारण काँग्रेसने दीर्घकाळ केलं. एवढ्यावर बहुमत मिळवायचं आणि राज्य करायचं हे काँग्रेसचं धोरण होतं. मग बाकी कोणाचं कामही नव्हतं आणि त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याची गरजदेखील नव्हती. त्यामुळे सातत्याने ओबीसींची उपेक्षा काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. आता यानिमित्ताने भाजपा आणि आरएसएसला बदनाम करण्याचं यांचं षडयंत्र उघड पडलं आहे.

आता जाती-धर्मात तणाव निर्माण करून, विष कालवून राजकारण करणं यापुढे अवघड होईल, याची कुणकुण या संधिसाधू लोकांना लागली असावी. त्यामुळे या विषयावर यांचं मौन आहे का, असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

९२७०३३३८८६

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# जल व्यवस्थापन जीवनशैली व्हावी

सध्या अंगाची काहिली करणारे कडक ऊन तापत आहे. बाहेरून घरात आल्यावर पाण्यासाठी जीव कासावीस होतो. थंडगार पाणी प्यावेसे वाटते. अजूनही अनेक गावात पाण्याची टंचाई आहे. तर, अनेक शहर आणि गावात ८ ते १० दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो. पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीसाठी जलसंपदा विभागामार्फत अकोला येथे आयोजित जल व्यवस्थापन पंधरवड्याचा समारोप करताना राज्याचे कामगार व अकोला जिल्हा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी जल व्यवस्थापनाची कृती ही पंधरवड्यापुरतीच मर्यादित न राहता जल व्यवस्थापनाचा अंगीकार जीवनशैली म्हणून झाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांची ही अपेक्षा अतिशय योग्य आहे. कारण मानवाने विज्ञानाच्या आधारावर अनेक असाध्य गोष्टी साध्य केल्या आहेत. तरीही माणसाला रक्त आणि पाणी या दोन गोष्टी अजून तरी तयार करता आलेल्या नाहीत. सर्व प्राणिमात्रांना जिवंत राहण्यासाठी रक्त आणि पाणी या दोन गोष्टींची नितांत आवश्यकता असते. राजस्थानात आजही पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी टाक्यामध्ये साठवून ठेवले जाते. त्याचा वापर वर्षभर पिण्यासाठी केला जातो. महाराष्ट्रातही जलयुक्त शिवार योजना राबविण्यापूर्वी अनेक गावांत दरवर्षी उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. जलयुक्त शिवारमुळे टंचाईच्या प्रमाणात घट झाली असली, तरीही संपूर्णपणे पाणी टंचाई दूर झालेली नाही. त्यामुळे पाण्याचा वापर पैशासारखा केला पाहिजे. त्याची उधळपट्टी न करता काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. आपल्या राज्यात धो धो पाऊस पडतो. पावसाचे पडणारे पाणी मोठ्या प्रमाणात नदी-नाल्यात वाहून जाते. तेव्हा, घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे आवश्यक आहे. त्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे गरजेचे आहे. पावसाचे जमिनीवर पडणारे पाणी अडविले पाहिजे. अडविलेले पाणी जमिनीत मुरविले पाहिजे. घराच्या छतावरील पावसाचे पाणी घराच्या बाजूला असलेल्या विहीर किंवा बोअरिंगमध्ये जिरविले पाहिजे. शेतातील वाहून जाणारे पावसाचे पाणी बांध घालून किंवा शेततळे करून अडविले पाहिजे. अडविलेले पाणी जमिनीत मुरेल. शेत किंवा घराजवळील जलस्रोतांच्या जलस्तरात वाढ होईल. हे जलस्तर उन्हाळ्यात आटणार नाहीत आणि आपल्याला पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही.


जलसंपदा विभागाने 'पाण्याचा प्रत्येक थेंब अधिक उत्पादन' या सूत्रानुसार शेती सिंचनासाठी पाण्याचा वापर योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता व्यक्त करून त्याबाबत जागरुकता करण्यासाठी कार्य करण्याची गरज वर्तविली आहे. शेती सिंचनासाठी आधुनिक पद्धतीचा वापर आवश्यक आहे. इस्रायलसारख्या देशाने ठिबक सिंचनाचा वापर करून शेतीच्या उत्पादनात क्रांती घडविली. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या वाणांची निवड करून ठिंबक, तुषार पद्धतीने पिकांचे सिंचन करावे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब उपयोगात आणणे शक्य होईल. पाणी शिळे झाले, असे आपण म्हणतो; वास्तविकत: पाणी कधी शिळे होत नाही. आपल्याकडे जर दररोज नळाला पाणी येत असेल तर दुसऱ्या दिवशी आपण शिळे झाले म्हणून पाणी फेकून देतो. एक किंवा दोन दिवसाआड पाणी येत असल्यास दोन दिवसांनी ते पाणी शिळे होते. ८ ते १५ दिवसाआड ज्या ठिकाणी पाणी येते, तेथे १५ दिवसांनी पाणी शिळे होते. धरणामध्ये पावसाचे पाणी साठलेले असते. म्हणजे ते पाणी वर्षभर शिळे होत नसते. नदीतील पाणी वाहते असल्याने ते शिळे होत नसते. याचा अर्थ पाण्याच्या उपलब्धतेवर आपण पाण्याचा शिळे आणि ताजेपणा ठरवितो. पण, पाणी नेहमी शुद्ध असते. ते शिळे होत नाही. तेव्हा, घरात आदल्या दिवशी भरून ठेवलेली सर्व पाण्याची भांडी दररोज रिकामी न करता ज्या भांड्यातील पाणी वापरले गेले असेल तेवढीच नळाला पाणी आल्यावर भरा. प्रातर्विधीसाठी खारे पाणी वापरा. अनेक लोक त्यांची दुचाकी, कार इत्यादी वाहने धुतात. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. वाहने धुण्यासाठी पाईपची धार न उडविता ओल्या फडक्याने वाहने पुसून काढा. त्यामुळे कमी पाणी वाया जाईल. सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानात जाऊ देणार नाही, असे भारताने म्हटल्याबरोबर पाकिस्तानात हाहाकार माजला. कारण सिंधूच्या पाण्यावरच पाकिस्तानातील शेती आणि जनता अवलंबून आहे. सिंधूच नव्हे, तर कोणत्याही नदीचे पाणी त्यांच्यासाठी आवश्यक आहे. यावरून पाण्याचे महत्त्व आपण समजले पाहिजे. आजपासूनच पाण्याचा वापर अत्यंत जपून करण्याची आपण सर्वांनी शपथ घेतली पाहिजे. जल व्यवस्थापन ही आपली जीवनशैली झाली पाहिजे, असा निश्चय आपण केला पाहिजे!

८८०६००६१४९

---

### वाहनांचे प्रखर एलईडी हेडलाईट

नागपूर शहरात रात्रीच्या वेळी कार चालवणे कठीण होत चाललं आहे. सिग्नल तोडणे, वेगाची मर्यादा ओलांडणे, वाहतुकीचे नियम न पाळणे आणि चुकीच्या मार्गाने वाहन चालवणे यासोबत अत्यंत प्रखर हेडलाईट ही समस्या जाणवू लागली आहे. पारंपरिक पिवळसर दिवे एलईडीमुळे कमी होत आहेत. एलईडी दिवे टिकाऊ असल्याने पाच वर्षांपर्यंत टिकू शकतात. ते शुभ्र पांढरा प्रकाश निर्माण करतात जो वाहनचालकाच्या डोळ्यांसाठी उत्तम असतो. एलईडी दिवे धुक्याच्या किंवा पावसाळी रात्री वाहन चालवण्यासाठी अत्यंत सोयीचे ठरतात. त्यांना कमीत कमी पॉवरची गरज असते. या दिव्यांचा प्रखर प्रकाश समोरून येणाऱ्या वाहनाच्या चालकासाठी त्रासदायक ठरतो. बहुसंख्य चालक वाहनाचे लाईट डिप्परऐवजी अप्पर ठेवून रात्रीच्या वेळी वाहन चालवतात. एलईडी हेडलाईटची प्रकाशकिरणे सरळ समोरून येणाऱ्या वाहनचालकाच्या डोळ्यात शिरतात आणि डोळे दिपल्याने त्याला काहीही दिसत नाही. वाहनाची गती कमी करावी लागते किंवा वाहन थांबवावे लागते. एलईडी लाईटच्या प्रखर प्रकाशकिरणांनी डोळ्यातील रेटिनाचं पण नुकसान होऊ शकतं. वाहनचालकाला काहीही दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढते. काही हौशी वाहनचालक बेकायदेशीरपणे जास्त पॉवरचे एलईडी लाईट वापरतात. वाहतूक विभागाने अशा बेजबाबदार वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करावयास हवी.



**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## वाचक पत्रे

### पहलगाम येथे स्मारक उभारा

पाकिस्तान कित्येक वर्षांपासून दहशतवादी कारवायांसाठी विशेषतः भारतविरोधी दहशतवादी कारवायांसाठी संपूर्ण जगात बदनाम आहे. याच बदनामीला साजेसा बदनामीचा कळस गाठणारा दहशतवादी हल्ला काश्मिरात अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे जमलेल्या पर्यटकांना त्याचे नाव व धर्म विचारून व हिंदू असलेल्या निष्पाप निरपराधी पर्यटकांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. मानवाधिकाराची हत्या करण्यात आली. पर्यटकांच्या निर्दोषपणाचा कसलाही विचार न करता हिंदू म्हणून हत्या करण्यात आली. बिच्चारे २६ पर्यटक नाहक मारले गेले. काश्मिरात विकास होतोय. पर्यटक निर्धास्तपणे काश्मिरात येत आहेत. फिरत आहेत. काश्मिरातील लोकांना पर्यटनामुळे भरपूर उत्पन्न मिळते आहे. लोक केंद्र सरकारचे गोडवे गात आहे हे पाहून पाकिस्तानचा जळफळाट झाला आणि आपली भडास काढण्यासाठी हा मानवतेला काळिमा फासणारा भ्याड दहशतवादी हल्ला घडवून आणला. त्यामुळे काश्मिरातील मुस्लिम बांधवांची कोंडी झाली, हे दहशतवादी विसरले. देशभरातील सर्व मुस्लिम हिंदू एकत्र येऊन देशभर पाकिस्तानविरोधी निदर्शने करीत आहेत, याची कल्पनाही पाकिस्तानने केली नसेल. दहशतवादी हल्ल्यात भारतातील निरनिराळ्या राज्यातील जे २६ लोक मारले गेले त्या निरपराध लोकांसाठी पहलगाम येथे लवकरात लवकर ठळक असे स्मारक उभारावे; ज्यामुळे काश्मिरात येणाऱ्या भविष्यातील देश-विदेशी पर्यटकांना पाकिस्तान सरकार पुरस्कृत या काळ्या दहशतवादी कृत्यांची इत्थंभूत माहिती या स्मारकाने मिळेल व पाकिस्तानची घृणास्पद दहशतवादी हल्ल्याची जगभर आपोआप नेहमीकरिता निंदानालस्ती होईल. केंद्र सरकारने मनावर घेऊन हे स्मारक वर्षभराच्या आत पूर्ण करावे, ही समस्त भारतीयांची इच्छा असेल.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

### काश्मिरातील अस्थिरता चिंताजनक

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरचे खोरे पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद केलेल्या गोळीबाराने २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना अत्यंत चिंताजनक आणि संतापजनक ठरते. संपूर्ण देशवासीयांचे मन गहिवरले आहे. आजपर्यंत दहशतवाद्यांनी काश्मीर खोऱ्यात अनेक हल्ले केले आणि हजारोंच्यावर निष्पाप लोकांचे तसेच देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिक तसेच अधिकाऱ्यांवर हल्ले केले. मात्र पहलगाममधील छोटे स्वित्झर्लंड म्हणून पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेले बैसरन भागात दहशतवाद्यांनी मोठा रक्तपातच घडवला आहे. या अगोदर नाव आणि धर्म विचारून हिंदू धर्मीय पर्यटकांना गोळ्या घातल्या. पुलवामा हल्ल्यानंतर ज्याप्रमाणे जशास तसे उत्तर दिले गेले, त्याचप्रमाणे अधिक कठोरतेने आता पहलगामनंतरही पाकिस्तानला अखेरचा निर्वाणीचा निरोप देण्याची वेळ आलेली आहे. पाकिस्ताने आपला विनाश ओढवून घेण्याला एक प्रकारे आमंत्रण दिलेले आहे, ही बाब स्पष्ट होते. पाकिस्तानची ही उरलीसुरली खुमखुमी संपुष्टात आणण्याची हीच योग्य वेळ आहे. या पर्यटकांनी काश्मीरमध्ये जाऊन तिथल्या बदललेल्या परिस्थितीचा आनंद घेण्याचा प्रयत्न केला होता. आपल्याच देशाच्या अत्यंत निसर्गरम्य जम्मू-काश्मीर राज्यात त्यांचे जाणे म्हणजे काश्मीरबरोबरचे संबंध दृढ करण्यासारखे आहे. म्हणून या पर्यटकांचे हौतात्म्य वाया जाऊ नये.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

सोलापूर तरुण भारत



# आरोग्यम् धनसंपदा



**वय वाढणे, काही विशिष्ट प्रकारची औषधे, जीवाणूंचा संसर्ग, मधुमेह आणि हार्मोन्सचे असंतुलन यासारखे आजार तसेच मेनिन्जायटिस, गोवर, गलगंड इत्यादी आजारांचा परिणाम ऐकण्याच्या क्षमतेवर होऊ शकतो. तसेच मोठ्या किंवा तीव्र आवाजाच्या संपर्कात सतत राहणे हे देखील एक कारण आहे.**

## समस्या बहिरेपणाची

**का**नाचे तीन भाग असतात. बाह्य कान, मध्य कान आणि अंतर्गत कान. बाह्य कान वातावरणातून ध्वनितरंगांच्या रूपाने आवाज ग्रहण करतो. हे तरंग कॅनलमधून जाऊन इअर ड्रमपर्यंत पोहोचतात. त्यामुळे इअर ड्रम कंप पावू लागतो. या कंपनांमुळे मध्य कानात असणार्या तीन अतिशय छोट्या हाडांमध्ये गती निर्माण होते आणि या गतीमुळे कानातील अंतर्गत भागात असणारे द्रव हलणे सुरू होते. आतील कानात हिअर सेल्स अर्थात ऐकण्याची क्षमता असणार्या पेशी असतात. त्या या द्रवाच्या गतीमुळे थोड्या वळ-तात आणि इलेक्ट्रिक पल्सच्या रूपात मेंदूकडे संदेश पोहोचवतात. हा संदेश आपल्याला शब्द आणि ध्वनीच्या रूपात ऐकू येतो.

**नुकसान होण्याचे प्रकार :** हिअरींग लॉस म्हणजे ऐकू येण्यातील दोष होय. ते दोन प्रकारचे असू शकते.

**१) कंडक्टीव्ह हिअरींग लॉस :** कानाच्या बाहेरील आणि मधल्या भागातून आलेल्या एखाद्या समस्येमुळे ही प्रक्रिया घडते. याला आजारपणामुळे होणारे बहिरेपण देखील म्हणतात. याची कारणे म्हणजे कानातून पू वाहणे किंवा संसर्ग होणे, कानांच्या हाडात काही गडबड होणे, कानाच्या पडद्याचे नुकसान होणे म्हणजे त्याला छिद्र पडणे किंवा गाठ होणे.

**२) सेन्सरी न्युरल हिअरींग लॉस :** आतील भागात निर्माण झालेल्या बिघाडामुळे ही समस्या उद्भवते. हिअर सेल्स नष्ट होऊ लागतात किंवा योग्य प्रकारे काम करू शकत नाही, तेव्हा असे होते. कानात जवळपास १५ हजार विशिष्ट हिअरींग सेल्स असतात. त्यानंतर मज्जातंतू असतात. त्यांच्यामुळेच आपण ऐकू शकतो. वय वाढते तसे या पेशी क्षीण आणि नष्ट होऊ लागतात. त्यामुळे मज्जातंतूही कमकुवत बनून ऐकण्याची शक्ती कमी होते.

याकडे लक्ष द्यावे. अशा वेळी शक्य तितक्या लवकर इलाज केला पाहिजे. सामान्य बोलणे ऐकण्यात अडचण होत असेल तर डॉक्टरांना भेटणे इष्ट ठरते. संसर्गामुळे ऐकण्याची क्षमता कमी झाली असेल तर औषधाने ती बरी करता येते. पडदा डॅमेज झाला असेल तर शस्त्रक्रिया करावी लागते. बरेचदा यावर औषधांनीही उपचार होऊ शकतो. मज्जातंतूंचे नुकसान झाले असेल तर ते बरे करता येत नाही. अशा वेळी हिअरींग एडचा वापर करता येऊ शकतो. यामुळे त्वरित उपचार होतो आणि समस्येत वाढ होणे रोखता येऊ शकते. हिअरींग एडचा वापर केला नाही तर मज्जातंतूंवरील ताण वाढतो आणि समस्या वाढत जाते. ऐकण्याची क्षमता जन्मतःच कमी असण्याची शक्यता असते म्हणून प्रत्येक मुलाच्या ऐकण्याच्या क्षमतेची तपासणी केली पाहिजे.

वय वाढणे, काही विशिष्ट प्रकारची औषधे, जीवाणूंचा संसर्ग, मधुमेह आणि हार्मोन्सचे असंतुलन यासारखे आजार तसेच मेनिन्जायटिस, गोवर, गलगंड इत्यादी आजारांचा परिणाम ऐकण्याच्या क्षमतेवर होऊ शकतो. तसेच मोठ्या किंवा तीव्र आवाजाच्या संपर्कात सतत राहणे हे देखील एक कारण आहे. सामान्यतः, ऐकण्यासाठी आपल्याला काही अडचण येत आहे हे समजते तोपर्यंत आपल्या ३० टक्के पेशी नष्ट झालेल्या असतात.

**लक्षणे :** ऐकण्याची क्षमता कमी होण्याची सुरुवातीची लक्षणे फारशी सुस्पष्ट नसतात. मात्र, ऐकण्याच्या क्षमतेत आलेली कमतरता काळानुसार आणखी कमी होत जाते यासाठी नाक, कान, घसा तज्ज्ञांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ६ महिन्यांपर्यंत मूल आवाजाकडे लक्ष देत नसेल किंवा दोन वर्षे वयापर्यंत एकही शब्द बोलू शकत नसेल तर त्वरित तपासणी करावी. पाच वर्षांपर्यंत मुलांच्या ऐकण्याच्या, समजण्याच्या आणि बोलण्याच्या क्षमतेचा पूर्ण विकास होतो. त्यासाठी याच वयापर्यंत त्याच्या ऐकण्याच्या क्षमतेत सुधारणा झाली तर चांगले असते.

**ऐकण्याची क्षमता कशी चांगली राखाल?**

जन्मतःच मुलांच्या कानांची तपासणी करावी. ४५ वर्षांनंतर कानांची नियमित तपासणी करावी. अधिक आवाजाच्या ठिकाणी काम करत असल्यास कानांना संरक्षण कवच वापरावे. त्यासाठी इअर प्लगचा वापर करावा. ९० डेसिबलपेक्षा कमी आवाज कानांसाठी ठीक असतो; मात्र यापेक्षा जास्त आवाज नुकसानदायक असतो त्यापासून दूर रहावे. हेडफोनद्वारे किंवा इअर बडच्या मदतीने जास्त काळ ऐकू नये. यामुळे ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. संगीत ऐकताना आवाज नेहमी मध्यम किंवा कमी ठेवावा. ऐकण्याची क्षमता चांगली राहाण्यासाठी अनुलोम, विलोम, कपालभाती, भस्त्रिका आणि भ्रामरी प्राणायाम अतिशय लाभकारी आहे. यामध्ये भ्रामरी विशेष लाभदायक ठरते.

चेहर्‍यावर सूज येणं, लघवी कमी होणं, लघवीला पुन्हा पुन्हा जावं लागणं, स्त्रियांना विटाळ कमी जाणं, अंगाला खाज सुटणं, त्वचा फाजील स्निग्ध दिसणं, कार्यशक्ती कमी होणं, विश्रांती घ्यावीशी वाटणं, जास्त झोप येणं, अंगाला घाण वास मारणं अशी लठ्ठपणा येण्याची लक्षणं असू शकतात. लठ्ठपणावर उपाय करायला सुरुवात करण्यापूर्वी प्रथम वजन पाहणं आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर कोणते स्नायू शिथिल आहेत, कुठे चरबी वाढली आहे हेही पाहायला हवं, त्यामुळे नेमका व्यायाम सुचवणं सोपं जातं.

## योगाद्वारे घ्या हृदयाची काळजी

**त**शा **स**रळ योगाद्वारे आपण हृदयाची काळजी कशी घेऊ शकतो. हे जाणून घेऊया...

**हृदयाच्या गतीवर परिणाम :-**

अनेक कारणांमुळे हृदयाची धडधड वेगवान किंवा मंद होते, ज्यामुळे हृदयात विकार निर्माण होतात. भीती, उत्तेजना, ताप, लैंगिक इच्छा किंवा कृती, खाणे, अतिव्यायाम अशा अनेक आजारांमध्ये हृदयाची गती वाढते. त्रास, अशक्तपणा आणि उपवासामुळे हृदय गती कमी होते. अनेक औषधांच्या सेवनामुळे हृदय गती वाढते आणि कमी होते. एखादे भयंकर दृश्य पाहिल्याने किंवा काही दुःखद बातमी ऐकून अचानक हृदयाची धडधड पूर्णपणे थांबते.

**हृदयविकाराचा झटका का येतो :-**

वेगवेगळ्या कारणांमुळे आणि लक्षणांमुळे हृदयाच्या धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्यास 'हृदयविकाराचा झटका' म्हणतात. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, कोलेस्ट्रॉल वाढणे, जास्त ताण, स्नायूंचा ताण इत्यादी अनेक कारणांमुळे हृदयविकाराचा झटका येतो.

**हृदयरोगावर उपचार :**

तुम्हाला हृदयविकार असल्यास काळजी घ्या. अल्कोहोल, मांस इत्यादी आणि मसालेदार आणि तिखट पदार्थांचे सेवन करू नका. मिठाई खाऊ नका. मीठ आणि स्निग्ध पदार्थ टाळा. फक्त फळे आणि भाज्यांच्या रसांवर काही दिवस जगा. शक्य असल्यास, फक्त फळे, भाकरी आणि दुधी भोपळ्याची भाजी खा. सकाळ- संध्याकाळ लिंबू पाणी, लिंबू-गरम पाणी-मध, कोणत्याही फळाचा किंवा भाजीचा रस प्या.

**१. खबरदारी :** सर्दी टाळा. कफ होऊ देऊ नका. पोट स्वच्छ ठेवा. कमी बोला. आवाज, धूळ, धूर आणि तीव्र सूर्यप्रकाश टाळा.

**२. योगासन :** शरीराचे अवयव हलवा. शवासन आणि पर्वतासन करा. जेव्हा तुम्ही निरोगी असाल तेव्हा सामान्य आसने करा ज्यात वज्रासन, उस्त्रासन, शलभासन, मकरासन, पवनमुक्तासन, मत्स्यासन, सिंहासन इ. सोयीनुसार सराव वाढवा. शेवटी ५ ते १० मिनिटे शवासन करा.

**३. प्राणायाम :** नाडी-शोधन, कपालभाती आणि भ्रामरी हळूहळू नियमित करा.

**४. योग निद्रा :** शवासनामध्ये २०-४० मिनिटे योग निद्रा करा. त्यानंतर अर्धा तास मनोरंजक शांत संगीत ऐका.

तुम्हाला हृदयविकार नसल्यास : नेहमी निरोगी आणि मजबूत राहण्यासाठी प्राणायाम, आसने, आहार संयम, योग निद्रा आणि ध्यान यांना तुमच्या जीवनाचा एक भाग बनवा. तणावमुक्त जीवन जगा. तणावमुक्त राहण्यासाठी नाडीशोधन प्राणायाम करा आणि शरीर मजबूत ठेवण्यासाठी सूर्यासन किंवा सूर्यनमस्कार करा.

**आहार संयम :** शक्य तितक्या कमी अन्न खा. तुमचे वजन जास्त असेल तर ते कमी करा. या आजारात उपवास टाळा, म्हणून फक्त फळे आणि भाज्यांचे रस, मध, मनुका, अंजीर, गाईचे ताजे दूध इ. दररोज आपल्या आहारात भरपूर सॅलड वापरा. सॅलड आंबट नसावे.

तुम्ही जे काही खाता ते कमी प्रमाणात खा, चघळत आणि हळूहळू. जेवताना पाणी कमी प्या. जेवल्यानंतर अर्धा ते एक तास पाणी प्या. रात्रीचे जेवण झोपण्याच्या अडीच तास आधी घ्या. आनंदी मूडमध्ये अन्न खा. बोलू नका. राग करणे आणि मोठ्याने बोलणे थांबवा.



## 'गुळ' आणि त्याचे औषधी उपयोग

**महाराष्ट्रात उसाचे जास्त उत्पादन घेतले जाते. बहुधा हवामान आणि माती त्याला पूरक आहेत म्हणून. हिरवेगार उसाचे मळे आणि त्यात लांब रसरसीत ऊस बघायला आणि खायला गोड लागतात. या उसाचे फायदेसुद्धा अनेक आहेत. उसाचा थंडगार रस, गोड रसरसीत काकवी आणि कडक गुळ या सर्वांचा आस्वाद घ्यायला मजा येते. पण सर्वात लांब पट्टा गाठला गूळ हा पदार्थने. गूळ हा सर्व स्वयंपाकघरात अवश्य आढळतो. एवढेच नाही तर देवाच्या मंदिरातसुद्धा गूळ खोबर्‍याचा मोठा मान आहे. गूळ जेवणात आणि एक न्याहरीचा प्रकार म्हणून खाल्ला जातो. भारतीय जेवणात गुळाचा वापर प्रकर्षाने केला जातो. भारताच्या निर्यात यादीत पहिला मान पटकवणारा पदार्थ गूळ आहे. चला बघूया या बहुगुणी गुळाचे फायदे.**



**रक्ताची शुद्धी -** नियमित आणि योग्य प्रमाणात गुळाच्या सेवनाने आपले रक्त शुद्ध होण्यास मदत होते. रक्तामधील हिमोग्लोबिन वाढते. रक्तदाब आणि शरीरातील विषाणू यावर नियंत्रण ठेवण्यास मदत मिळते.

**उत्तम पचन क्रिया -** गूळ आपल्या पचन शक्तीची ऊर्जा वाढवते आणि त्यामुळे पचन व्यवस्थित होते. हिवाळ्यात गूळ जरूर खावा. कारण त्यावेळी शरीराची पचनक्रिया मंदावते आणि गुळामुळे ती पूर्ववत होण्यास मदत होते. बद्धकोष्ठता आणि अपचन यावर गूळ तर रामबाण उपाय आहे.

**ऊर्जा स्त्रोत -** साखर ही फक्त गोडवा देते आणि एक आधुनिक प्रकार आहे. मात्र, गुळात नैसर्गिकता जास्त असल्यामुळे तो शरीराला हळूहळू आणि दीर्घ काळापर्यंत ऊर्जा देतो. गुळाने थकवा जाणवत नाही व स्नायू बळकट बनतात.

**हाडांचा मित्र -** गूळ जर आल्याबरोबर खाल्ला तर सर्व प्रकारच्या सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. दूध आणि गूळ हे एकत्रित हाडांसाठी एक मजबूत उपाय आहे.

**अर्धशिशी थांबते -** ज्या लोकांना अर्धशिशीचा त्रास आहे, त्यांनी गूळ आणि शुद्ध तूप एकत्रित रिकाम्या पोटी खाल्ल्याने आराम मिळतो. गूळ हा अशावेळी लाभदायक ठरतो.

**वजन कमी करण्यासाठी -** गुळात भरपूर प्रमाणात खनिज आहे. त्यात आढळलेल्या पोटॅशियम या घटकामुळे शरीरातील चयापचय वाढते आणि वजन कमी होण्यास मदत होते. शरीराची पाणी जतन करून ठेवण्याची सवयसुद्धा गुळाने मोडण्यास मदत करते व आपले वजन कमी होते.

**सर्दी-खोकल्यावर गुणकारी -** साधारण सर्दी-खोकला झाला असल्यास गुळाच्या चहाने किंवा गूळ मिश्रित गरम पाणी पिल्याने आराम पडतो. रात्री झोपण्याआधी गुळ चोखून खाल्ल्याने खोकल्यापासून आराम मिळेल.


**रक्तक्षय टाळतो -** गुळात प्रचंड प्रमाणात लोह आहे. तो खाल्ल्याने शरीरातील लोह कमतरता भरून येते. त्याच्या सेवनाने लाल रक्तपेशी वाढण्यास मदत होते व अशक्तपणा जाणवत नाही. थकवा आणि ऊर्जे ची कमी असे विकार गूळ खाल्ल्याने होत नाहीत.

**स्त्रियांसाठी उपयुक्त -** मासिक पाळीच्यावेळी होणार्या वेदना आणि पोटदुखीवर गूळ खूप गुणकारी आहे. त्याचे सेवन हे सर्व दुखणे कमी करण्यास मदत करतात. ओटीपोटातील दुखणे, स्नायू दुखणे, अस्वस्थ वाटणे अशा प्रकारच्या सर्व गोष्टींवर गूळ हा सोपा आणि स्वस्थ उपाय आहे.

**त्वचा आणि केसांचे आरोग्य -** सुंदर, लांब सडक आणि चमकदार केसासाठी गुळाचे सेवन आवश्य करा. जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी भरलेला गूळ त्वचेवर एक छान चमक आणतो आणि सर्व मुरुम, पुरळ आणि डाग नाहीसे करण्यास मदत करतो.

रसायनमुक्त आणि पोषक गूळ आरोग्यदायी आहे. पण आपल्याला मधुमेह किंवा अन्य काहीही आजार असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेऊनच पुढचे पाऊल टाकणे फायद्याचे ठरेल.

## व्हर्टिगो अ‍ॅटॅक म्हणजे काय?



**व्ह**र्टिगो ही सवसामान्य समस्या आहे. यात चक्कर येणे आणि रक्तदाब कमी होणे यासारख्या अडचणी येतात. व्हर्टिगो कोणालाही होऊ शकतो. व्हर्टिगो ही एक मेडिकल कंडिशन असून त्यात रक्तदाब कमी होण्यामुळे अशक्तपणा येऊ शकतो. व्हर्टिगोचा अर्थ चक्कर येणे, फिरणे. या स्थितीत रुग्णाला चक्कर येते. डोकेदुखीबरोबरच चक्कर येते आणि तोल जातो. व्हर्टिगोचे लक्षणे पाहिल्यास अस्थिर किंवा असंतुलित जाणवणे, उंचीची भीती वाटणे, कमी ऐकू येणे, पडण्याची भीती वाटणे, अधिक आवाजाने डोकेदुखी, चक्कर येणे अशी काही दिसून येतात.

**बीपीपीव्ही :** बिनाईन पॅराऑक्सिमल पोझिनशनल व्हर्टिगो म्हणजेच बीपीपीव्ही. यात कानाातील शिरात कॅल्शियम कॉर्बोनेटचा कचरा जमा होतो. वयस्क रुग्णांत बीपीपीव्हीचे कारण अधिक असते.

**मेनियार्स :** मोनियार्स व्हर्टिगो हा कानाच्या आतील भाग आहे. तो ऐकण्याच्या शक्तीवर परिणाम करतो आणि कानात आवाज येत राहतो. त्यामुळे काही तासांत चक्कर येण्याची शक्यता रा-हते. कानात साचलेल्या पाण्यामुळे हा त्रास होतो.

**वेस्टीब्यूलर मायग्रेन :** वेस्टीब्यूलर व्हर्टिगोचे कारण सामान्य आहे. चक्कर येणे, डोकेदुखी होणे हे सामान्य लक्षणे आहेत. ते सर्वांत दिसतात. यात रुग्ण हा अतिप्रकाश आणि आवाज सहन करू शकत नाही.

**लेब्रिथिनायटिस :** ही एक कानातील समस्या असून ती सर्वसाधारपणे संसर्गाशी निगडीत आहे. हा संसर्ग शिरेजवळ कानात सूज येण्यास कारणीभूत ठरू शकते

## गरोदरपणातील पाठदुखी

**ग**रोदरपणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये पाठदुखी ही काही जणींना मोठ्या प्रमाणात होत असते. गरोदरपणात पाठदुखीचे प्रमाण अगदी ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत आहे. त्यापैकी ५० टक्के महिलांना पाठीच्या खालच्या भागाचे दुखणे सहन करावे लागते. डॉक्टरांच्या मते महिला आपल्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी पाठीच्या खालच्या भागातील दुखण्याला सामोर्‍या जातात. साधारणपणे गरोदरपणाच्या पाचव्या ते सातव्या महिन्यादरम्यान ही पाठदुखी दिसून येते. गरोदरपणात ज्या स्त्रियांना शारीरिक कष्टाचे काम करावे लागत असेल, त्यांना या अवस्थेत पाठदुखी होण्याचा संभव असतो. म्हणजेच कोणत्याही प्रकारची अतिरेकी हालचाल होता कामा नये.

या पाठदुखीमध्ये तरुण वय आणि आधी झालेल्या अनेक प्रसूती हे कारण आहे. या दुखण्याकडे दुर्लक्ष केल्यास मातेच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

गरोदरपणात पाठदुखी नियंत्रणात ठेवण्यासाठी बसताना किंवा उभे राहताना, चालताना अथवा झोपताना शरीराला सुयोग्य स्थितीत ठेवावे. पाठीच्या खालच्या भागातील दुखणे उद्भवू नये यासाठी प्रयत्न करावा. गरोदरपणात खूप काळ बसलेल्या स्थितीत राहाणे म्हणजे पाठदुखीला निमंत्रण. त्यामुळे इकडे तिकडे फिरणे योग्य ठरते.

तुमच्या पाठीच्या कण्यावर अतिरिक्त भार येतो आणि पाठदुखी वाढते. केव्हाही बसताना पाठीच्या मागे उशी ठेवा. जेणेकरून तुमच्या पाठीला आधार मिळू शकेल. गरोदरपणात पाठदुखी असल्यास सुरुवातीपासूनच डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आणि सल्ल्यानुसार पाठीचे आणि ओटीपोटीचे व्यायाम करावेत. डॉक्टरांनी दिलेल्या वेळेनुसारच हे व्यायाम करावे. यामुळे तुमच्या शरीराचा बांधा सुयोग्य राखतील आणि तुमची दैनंदिन कामे करणे तुम्हाला सोपे जाईल.



# संस्कार शिबीरे काळाची गरज आहे

## सेवासदनच्या संस्कार शिबीरात आ. तान्हाजी मुटकुळे यांचे प्रतिपादन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

बालमनावर संस्कार होणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आज मुलांचा एकलकोंडेपणा वाढला आहे. अशावेळी मुले हट्टी बनत आहेत. मुलांचे मन स्थिर होणे, त्यांनी आपले विचार व्यक्त करणे महत्त्वाचे आहे आणि म्हणून अशी संस्कार शिबिरे काळाची गरज आहे, असे मत आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले.

हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी सेवासदन परिवाराच्यावतीने घेण्यात येत असलेल्या संस्कार शिबिरास सदिच्छा भेट दिली. यावेळी योग शिबीराचे त्यांच्याहस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी सेवासदनचे संचालक धनराज कदम व मीरा कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, धनराज कदम आणि मीरा कदम यांनी अतिशय स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. मुलांनी आपल्या आई वडिलांचा आदर करावा. आपले आई वडील आपल्यासाठी काय करतात याची जाण ठेवावी. मीरा कदम समाजासाठी देत असलेले योगदान मोलाचे आहे असे आ. मुटकुळे म्हणाले.

या शिबीरात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे नातू पृथ्वीराज, महिला पतंजली योग समिती जिल्हा प्रभारी तथा कोषाध्यक्ष स्पोर्ट योगासन असोसिएशन ज्योतीताई वाघमारे, बालकलाकार अधिराज, युवराज, अरविंद तसेच धनराज कदम, मीरा कदम व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संस्कार शिबिर परिवारात आणि सेवासदन परिवाराच्यावतीने आ. मुटकुळे यांचा सत्कार करण्यात आला. दिनांक २ मे २०२५ ते ८ मे २०२५ या कालावधीत सेवासदन परिवाराच्या वतीने संस्कार शिबिर घेण्यात येत आहे. या संस्कार शिबिराचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. साथ फाउंडेशनचे अध्यक्ष धनराज कदम यांच्या मातोश्री कांताबाई कदम यांच्या हस्ते हे उद्घाटन संपन्न झाले. त्याचबरोबर या उद्घाटन प्रसंगी युट्युब स्टार, तसेच चित्रपट अभिनेता आदिराज त्यासोबतच युवराज विविध मिमिक्री करणारा कलाकार अरविंद राठोड, पोदार इंटरनॅशनल स्कूल हिंगोलीच्या प्राचार्या अर्चना देशपांडे तसेच विद्यार्थ्यांचे पालक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्वांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर अधिराज आणि युवराज या जोडीने मुलांसमोर आपला परफॉर्मन्स सादर केला. सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात विविध प्रकारच्या ऍक्टिव्हिटीज घेतल्या जाणार आहेत. शाळेला उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्यानंतर मुलांनी टीव्ही मोबाईल पासून दूर राहावे व त्यांना काहीतरी चांगले शिकता यावे यासाठी या शिबिराचे आयोजन धनराज कदम व मीरा कदम यांनी केले आहे.

# हायवा ऑटोवर उलटल्याने २ प्रवाशी ठार, ३ गंभीर

## वसमतच्या कौठा रस्त्यावरील घटना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

वसमत येथील कौठा रस्त्यावर भरधाव हायवा उलटून ऑटोवर पडल्यामुळे ऑटोतील दोघेजण चिरडून ठार णाले तर तिघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी दि ३ मे रोजी दुपारी घडली आहे. घटनास्थळी मोठा जमाव एकत्र आला असून मदत कार्यात अडथळा निर्माण झाला होता. या घटनेनंतर हायवा चालक मात्र फरार झाला आहे.

वसमत येथील कौठा रोडवर एका विटभट्टीसाठी हायवामधून मातीची वाहतुक केली जात होती. शनिवारी दुपारच्या सुमारास माती घेऊन निघालेला हायवा क्र एमएच २० टी ९७९७ हा कौठा रोडचय दिशेने जात होता. यावेळी मदिना चौक भागात रॉंगसाईडने येणाऱ्या हायवा चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर त्याने समोरून येणाऱ्या ऑटोला धडक दिली. या अपघातानंतर हायवा जागेवचर उलटला. प्रवाशांनी भरलेला ऑटो हायवा खाली सापडला. या अपघातात ऑटोतील यास्मीन मोईनखान रा मनमाड, शेख शोएब रा कुरूंदा यांचा हायवा खाली चिरडल्याने जागीच मृत्यु झाला. तर आझाद मोईनखान वय ७, आफान मोईनखान वय ५ रा मनमाड, संतोष खनके वय ४० रा शामनगर वसमत हे ऑटोबाहेर फेकल्या गेल्याने गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची माहीती मिळताच पोलिस उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सपोनि गजानन बोराटे, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, महाजन, जमादार गजानन भोपे, शेख इम्रान, विनोद दळवी, रवी बोरलावार, प्रशांत मुंढे यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी घटनास्थळी मोठा जमाव जमला होता. पोलिसांनी तेथील गर्दी हटविल्यानंतर दोन जेसीबी आणि एका क्रेनच्या सहाय्याने हायवाला बाजुला करून वाहतुक सुरळीत केली. हायवाखाली सापडलेल्या ऑटोचा चुराडा झाला होता. या अपघातानंतर हायवा चालक फरार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. जखमी असलेल्या तिघांवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी आ. राजू नवघरे यांनी भेट दऊन स्थितीचा आढावा घेतला.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेची रक्कम लाभार्थींच्या खात्यावर जमा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

६५ वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र, इत्यादीद्वारे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी सन २०२३-२४ पासून 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील सर्व नगर परिषद, नगरपंचायत व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्यामार्फत एकत्रित २१ हजार ७६२ अर्ज प्राप्त झाले असून छाननीअंती १५ हजार १४८ अर्जांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत वेबसाईटवर लाभार्थींचे आवेदनपत्र शासनास ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी ८ हजार ५७४ लाभार्थ्यांचे बँकखाते आधार संलग्न आहेत. त्यानुसार त्यांना प्रत्येकी एकवेळ एकरक्कमी तीन हजार रुपये लाभार्थ्यांच्या वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्यामध्ये शासनामार्फत डीबीटी प्रणालीद्वारे वितरण करण्यात आले आहेत. तसेच वितरीत केलेल्या निधीबाबत लाभार्थ्यांनी सहाय्य साधने, उपकरणे खरेदी केलेल्या (उदा. चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, कंबर बेल्ट व सर्वाइकल कॉलर इ.) साहित्य किंवा मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी डॉक्टराकडून केलेल्या उपचार किंवा सबंधित दुकानदाराकडून खरेदी केलेल्या निधीचा उपयोग कशा प्रकारे केलेला आहे, अशा वस्तुंचे इनव्हाइस, पावती आपल्या जवळील नगर परिषद, नगर पंचायत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास सादर करावी.तसेच हिंगोली जिल्ह्यातील ६ हजार ५७१ लाभार्थ्यांनी आपल्या अर्जातील माहिती संकेतस्थळावर जाऊन वयोश्री योजनेसाठी स्वतः अर्ज भरण्यासाठी लाभार्थ्यांनी दिलेल्या लिंक वर क्लीक करून, प डाउनलोड करुन आपल्या अर्जातील आधार संलग्न बँक खाते, मोबाईल क्रमांक, आधार प्रमाणे आपले नाव इंग्रजीमध्ये अद्यावत करण्यात यावे, जेणे करुन या योजनेची रक्कम आपल्या बँकेमध्ये शासनामार्फत जमा होईल, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांनी केले आहे.



**हिंगोली– सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती आणि छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळा समितीच्यावतीने महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ, आ. तान्हाजी मुटकुळे, जिल्हाधिकारी गुप्ता आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### स्मार्टचे प्रमुख अशोक किरनळ्ळी यांची भेट



हिंगोली– राज्याचे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) चे प्रमुख तथा कृषी संचालक(आत्मा) अशोक किरनळ्ळी यांनी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अंतर्गत हिंगोली तालुक्यातील फाळेगाव येथील श्री फाळेश्वर महाराज शेतकरी उत्पादक कंपनीला नुकतीच भेट देऊन बांधकामाची पाहणी केली. यावेळी श्री. किरनळ्ळी यांनी कामाची सद्यस्थिती जाणून घेतली. तसेच मशिनरी उभारणी, घटक लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. खरेदी-विक्री बाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी संचालक मतीराम वैद्य यांच्याकडून किरनळ्ळी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक (आत्मा) राजेंद्र कदम, स्मार्टचे नोड अधिकारी जी. बी. बंटेवाड, कंपनीचे संचालक व इतर सभासद उपस्थित होते.

### पंडीतराव जामकर यांचे वृध्दापकाळाने निधन



हिंगोली– शहरातील जिजामाता नगर आदर्श महाविद्यालय जवळील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील जामकर यांचे वडील पंडितराव गणपतराव जामकर (८८) यांचे ३ मे रोजी सकाळी ११:३५ वाजता वृद्धपकाळाने निधन झाले. आदर्श महाविद्यालय परिसरातील पावर हाऊस जवळील स्मशानभूमीत आज सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### आज परशुराम जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा

हिंगोली– सकल ब्राम्हण समाज आणि परशुराम ग्रुपच्यावतीने दि ४ मे रोजी भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील मंगळवारा भागातील जुने दत्त मंदिर येथून दुारी ३.३० वाजता शोभायात्रेला सुरूवात होणार आहे. ही शोभायात्रा शहरातील माहेश्वरी मंगल कार्यालय, देवगल्ली, कपडा गल्ली, मारवाडी गल्ली, गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफिस रोड मार्गे गायत्री भवन येथे पोहोचणार आहे. गायत्री भवन येथे संध्याकाळी साडेसात वाजता भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर रात्री ८ ते १० या वेळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या शोभायात्रेची जय्यत तयारी करण्यात आली असून शोभायात्रेसह इतर कार्यक्रमात सहभाग घेण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात अवैध दारू गाळप व विक्री विरोधात पोलिसांची विशेष मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

हिंगोली पोलिस विभागाकडून दि २ मे रोजी जिल्ह्यात अवैध दारू गाळप व विक्री विरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. यावेळी पोलिसांच्या पथकांनी २० ठिकाणी छापे मारून अवैध दारू जप्त करीत २० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

हिंगोलीच्या प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या आदेशानुसार दि २ मे रोजी हिंगोली पोलिसांनी जिल्ह्यात अवैध दारू गाळप व विक्री विरोधात विशेष मोहीम राबवली. या मोहीमेत जिल्ह्याती सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यांचे प्रभारी पोलिस अधिकारी, दुय्यम अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे तीन अधिकारी व ११८ अंमलदार यांनी या मोहीमेत सहभाग घेतला होता.

पोलिसांनी जिल्ह्यातील एका अवैध हात भट्टीचे गाळप व विक्रीचे ठिकाणी कार्यवाही करीत सदर ठिकाणचे हातभट्टीसाठीचे लागणारे रसायन व इतर साहीत्य नष्ट करून प्रभारी कार्यवाही केली. सदर हातभट्टी दारू एकूण १२ लिटर तसेच सदर मोहीमेत अवैध देशी दारू विक्रीच्या २० ठिकाणी २९४ देशीदारू बॉटल्स जप्त करून कार्यवाही केली. या माहीमेत विविध पोलिस ठाण्यांतर्गत एकूण २१ आरोपी विरोधात २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# औंढा नागनाथ शहरात एकाच रात्रीत चोरट्यांनी ११ दुकाने फोडली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

औंढा नागनाथ येथील मुख्य बाजारपेठेतील तब्बल ११ दुकाने चोरट्यांनी एकाच रात्रीत फोडल्याची घटना शनिवारी पहाटे ३ वाजता उघडकीस आली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे.

औंढा नागनाथ येथील मुख्य बाजारपेठेत शहराच्या कमानीजवळच गोबाडे व्यापारी संकुल व त्याच्या समोरच्याच बाजुला ठाकूर व्यापारी संकुल आहे. याठिकाणी मोबाईल शॉपी, झेरॉक्स सेंटर, आईस्क्रीम पार्लर तसेच तीन आपले सरकार सेवा केंद्र आहेत. संबंधित दुकानाचे मालक शुक्रवारी दि २ मे रोजी रात्री दुकाने बंद करून घरी गेले होते. त्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी बाजारपेठेत येऊन चांगलाच धुमाकुळ घातला. चोरट्यांनी काही दुकानांचे शटर उचकटून आत प्रवेश केला तर काही दुकानांचे कुलूप तौडून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यांनी दुकानातील साहीत्याची नासधुस केली. त्यानंतर दुकानातील ऐवज घेऊन पोबारा केला आहे.

आज पहाटेच्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्या नागरिकांना दुकानांचे शटर उचकटलेले दिसून आले. त्यांनी तातडीने दुकान मालकांना सांगितले. या घटनेची माहीती शहरात कळताच नागरिक मोठ्या संख्येन घटनास्थळी दाखल झाले. यावेळी एक दोन नव्हे तर तब्बल ११ दुकाने फाडलेली दिसून आली. तयनंतर घटनेची माहीती पोलिसांना मिळताच सपोनि अरूण नागरे, जमादार ज्ञानेश्वर गोरे, माधव सुर्यवंशी, संतोष धनवे, यांचय पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील दुकानांमध्ये असलेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या घटनेमध्ये नेमका किती रूपयांचा ऐवज चोरीला गेला हे अद्याप कळू शकले नाही. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून काही दिवसांपुर्वीच चोरट्यांनी चार दुकाने फोडली होती. मात्र त्याची तक्रार देण्यात आली नाही. आता तब्बल ११ दुकाने फोडल्यामुळे व्यापाऱ्यांतून भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वसमत नगर परिषदेच्या कामांमध्ये अपारदर्शकता ?

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ मे**

नगरपरिषद अंतर्गत होत असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती, नागरोत्थान महाभियान योजने अंतर्गत शहरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू असतानाही, या कामांबाबतची माहिति जनतेपासून लपवली जात असल्याची धक्कादायक प्रकारसमोर आला आहे.

शासकीय विकास कामे होत असताना नियमानुसार प्रत्येक कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे बंधनकारक असूनही, कोणत्याच कामावर अशा प्रकारचे फलक लावण्यात आलेले नाहीत.

योजनेतून मंजूर झालेल्या कामांबदल ची माहिती, माहिती अधिकार कायद्यानुसार विचारणा करण्यात आली. मात्र नगर परिषदेचे कर्मचारी वेळेत माहिती देत नसल्याचे समोर येत आहे. विशेष म्हणजे माहिती अधिकार अंतर्गत दाखल केलेल्या अपीलांनाही वेळेत सुनावणी दिली जात नाही. या पाठीमागचे गोडबंगाल काय माहिती अधिकारात अर्जदारांची दिशाभूल केली जाते, तर तक्रार अर्ज दिल्यानंतर त्याचीही दखल घेतली जात नसल्याची शहरातील नागरिकांचा आरोप आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी, शहर अभियंता आणि ठेकेदार यांच्यात संगनमत असून, त्यांना कोणाचा तरी राजकीय किंवा प्रशासकीय पाठिंबा मिळत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या संगनमतामुळे निकृष्ट दर्जाची कामे करून शासनाच्या निधीचा गैरवापर केला जात आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी कामे प्रशासकीय मान्यतेनुसार होत नसल्याचे देखील दिसून येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होतोय, तसेच नियोजनबद्ध विकासाऐवजी दिखाऊ आणि निकृष्ट कामांचा प्रघात वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय समिती गठीत करून चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शहरातील सुजाण नागरिकांमधून होत आहे. तसेच, वसमत नगर परिषदेच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

> विकासाच्या नावाखाली गूढ व्यवहार? वसमत नगर परिषदेच्या कामांवर प्रश्नचिन्ह
> कोट्यवधींचा खर्च पण पारदर्शकतेचा अभाव; वसमतच्या नागरी कामांमागे लपलेलं गूढ बाहेर निघणार हे मात्र नक्की माहिती नाही, दर्जा नाही; वसमत शहरातील कामांमध्ये होत असलेल्या निकष्ट कामाचा खुलेपणाचा अभाव सुवर्ण जयंती योजनेचा काळा पैलू? वसमत नगर परिषदेकडून सूजान नागरिकाची दिशाभूल मनमानी अपारदर्शकता आणि शासकीय निधीचा गैरवापर; कोट्यावधी रुपयाचा निधी येऊनही कुठलीच मशनरी व यंत्रणा न लावता मॅन्युअली पद्धतीने कामे सुरू असल्याचे दिसत आहे.

# नीट परीक्षेमुळे परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मे**

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षा २०२५ वसमत येथील जवाहर नवोदय विद्यालयात रविवारी दि ४ मे रोजी होणार आहेत. या केंद्रावर अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांच्या आदेशानुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

जवाहर नवोदय विद्यालय हे नीट परीक्षेचे उपकेंद्र असून याठिकाणी दुपारी २ ते ५ आणि दिव्यांग उमदेवारांसाठी २ ते ६ या वेळात परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार परीक्षा उपकेंद्राचे इमारती व परिसर यामध्ये परिक्षेच्या शांततापूर्ण आयोजनासाठी प्राधिकृत व्यक्तीशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरात फोन, झेरॉक्स मशीन, टेलीफोन बुथ चालू ठेवण्यास निर्बंध, सदरील आदेश हा नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी तसेच परीक्षेसाठी येणारे विद्यार्थी यांना परीक्षा केंद्रात प्रवेशासाठी लागू राहणार नाही. परीक्षार्थी यांना परिक्षा केंद्रात डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल, पेजरख गणकयंत्र आदी घेवून जाण्यावर बंदी आहे, असे आदेश अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी जारी केले आहेत.

# देगलूर वनपरिक्षेत्र विभागाने कृत्रिम पानवठ्यातून भागविली वनातील प्राण्यांची तहान

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ०३ मे-**

सध्या एप्रिल महिन्यामध्ये कडक उन्हाचा पारा वाढला असून.देगलूर वनपरिक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या वन परिक्षेत्रातील नैसर्गीक पाण्याची स्त्रोत पुर्णतः आटली असुन. वनातील वन्यप्राण्यांना मानवी वस्ती कडे पाण्यासाठी भटकंती करावी लागत असतांना गावातील पिसाळलेल्या कुत्र्यांचा शिकार होऊन मृत्यू पावत आहे त्या अनु षंगानेच देगलूर वनपरिक्षेत्रातील अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक सहदेव दोसलवार यांनी अंजनी,केरुर, लोहगांव,नरसी सह अन्यगांवच्या वन्य परिसरातील कृत्रिम पाणवठ्यात ट्रॅक्टरच्या सहाय्याने पाणीपुरवठा करुन. वन्यप्राण्या ची तहान भागविली आहे.

वातावरणातील पर्यावरण संतुलित राहावे या अनुषंगाने राज्यसरकारने राज्याच्या अर्थ संकल्पात दरवर्षी बजेटची स्वतंत्र तरतूद राज्यातील गायरान तथा शासकीय जमीनीवर मानवी आरोग्यास लाभ दायक पर्यावरण पुरक अशा वृक्षांची खूप मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली असुन जिल्ह्यातील बिलोली व नायगांव तालुक्यातील बराचसा



भुभाग हा बर्या पैकी वनपरिक्षेत्राने व्यापला असून. येथील वनपरिक्षेत्र हे देगलूर वन परिक्षेत्राच्या नियंत्रणाखाली असुन. येथील वन परी क्षेत्र वन्य प्राण्यांना पोषक असल्यामूळे या परिसरात हरिण,काळवीट, निल गाय,रानडुक्कर,ससे या सारख्या खुप मोठ्या प्रमाणात संचार वाढला आहे. परंतू मागील वर्षात पावसाचे प्रमाण काही कमी झाल्यामूळे यंदाच्या वर्षातील एप्रिल महिन्यांच्या शेवटच्या आठ वड्यात भयंकर ऊनाचे प्रमाण वाढल्यामूळे अंजनी, केरूर,नरसी, धानोरा, कुंचेली, मुगांव, लोहगांव या वन परिक्षेत्रा तील नैसर्गीक पाण्याचे स्त्रोत पुर्णतः आटल्याने या ठिकाणचे वन्यप्राण्यांनी पाण्याच्या शोधात परिसरातील मानवी वस्तीकडे जात आसतांना यावेळी वन्य प्राण्यांना जिवगमवा वा लागला तर प्राणी शिकारी सावजाचे बळी ठरत आहे. त्यामूळे या वन परिक्षेत्रातील वन्य प्राण्यां ची संख्या खूप रोडावत चालली आहे त्याअनुषंगाने उपवनरक्षक अधिकारी रक्षक केशव वाबळे, सहाय्यक वनरक्षक भिमसिंग ठाकूर(तेंदू,व कॅम्पा)यांच्या आदेशान्वये देगलूर वन परि क्षेत्राचे अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मार्च रोजी सकाळी वनरक्षक सहदेव दोसलवार यांनी अंजनी, केरूर, नरसी,धानोरा,कुंचेली, मुगांव, यावन परिक्षेत्रातील वन्य प्राण्यांसाठी बनविण्यात आलेल्या कृत्रिम पाणवठे ट्रॅक्टरच्या सहाय्याने पाणी पुर्णतःहा भरुन ठेवल्याने वन्य प्राण्यांची तहान भागविली आहे .त्यामूळे या परिक्षेत्रा तील वन्य प्राणी प्रेमी नागरिकांनी देगलूर येथील वन परिक्षेत्र विभागातील अधिकारी वर्गाबद्दल समाधान व्यक्त करीत. या वेळी आभार मानले आहे.

देगलूर वनपरिक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या अंजनी,नरसी, लोहगांव येथील वन परिक्षेत्रातील कृत्रिम पाणवठ्यात वनरक्षक दोसलवार यांनी ट्रॅक्टरच्या सहाय्याने वन्य प्राण्यांसाठी पाणी पुरवठा केला.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत चव्हाणवाडी येथे पक्ष प्रवेश मेळावा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ०३ मे-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे ११ मे रोजी चव्हाणवाडी ता.मुखेड येथे येणार असून त्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील विविध पक्षातील मान्यवर नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते,मा.जि.प.सभापती तथा आयोजक स्वप्निल चव्हाण यांनी दिली .

उपमुख्यमंत्रीअजित दादा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे,उच्च व तंत्र शिक्षण तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री इंद्रनील नाईक,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश अध्यक्ष रूपाली चाकणकर, माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे, शिक्षक आ. विक्रम काळे, आ. प्रताप पाटील चिखलीकर , रा. काँ.चे जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आ. अविनाश घाटे, रामदास पाटील सूमठाणकर आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहितीही स्वप्नील चव्हाण यांनी दिली.राज्यातील विरोधी पक्षातील काँग्रेस सह शिव सेना (उबाठा )आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या पक्षातील नेते व कार्यकर्त्यांची कोंडी झाली असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. नजीकच्या काळात विरोधी पक्षाला सत्ता मिळणार नाही हे निश्चित असल्यामुळे आपली पत व प्रतिष्ठा टिकून ठेवण्यासाठी राजकीय पक्षातील नेतेमंडळी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या या जाहीर पक्ष प्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणात पक्ष प्रवेश करणार आहेत.चव्हाणवाडी येथे पार पडणाऱ्या या सोहळ्याला जिल्ह्यातील इच्छुक नेत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक स्वप्नील चव्हाण यांनी केले आहे.

## खरब खंडगांवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती स्मारकाचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०३ मे-**

मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथे भारतीय घटनेचे शिल्पकार,विश्वरत्न,प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधत गुरुवार दि.१ मे रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मारकाचे भव्यदिव्य उद्घाटन मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.तुषार राठोड व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रम अध्यक्ष माजी जि.प.सदस्य दशरथराव लोहबंदे,स्वागताध्यक्ष खरब खंडगांवचे सरपंच मा.डॉ. रणजित काळे ,विशेष अतिथी व्यंकटराव लोहबंदे आदीसह अनेक जण उपस्थित होते.

# धानोरा (कौठा) येथे भिमजयंती सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०३ मे-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती दि २९ एप्रिल २०२५ रोजी धानोरा (कौठा) येथे मोठ्या उत्सवात पार पडला.यावेळी पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण ग्रामपंचायतचे सरपंच तुकाराम तळणे तर निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण माजी उपसरपंच अरुण कदम यांच्या हस्ते करण्यात आले.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती सोहळा दिनांक २९ एप्रिल रोजी धानोरा (कौठा) तालुका कंधार येथे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी सकाळच्या सत्रात निळ्या व पंचरंगी दोन्ही ध्वजाचे मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे धुपपुजा, पुष्पपुजा करूण ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भिम जयंती मंडळाने महिल्यातील ज्येष्ठ नागरिक शिवराम सोनकांबळे, नागोराव सोनकांबळे,गणपत गूरूजी सोनकांबळे, व वैभव सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती मंडळाचे अध्यक्ष धम्मानंद शिवराम सोनकांबळे व उपाध्यक्ष गौतम विठ्ठल सोनकांबळे, कोषाध्यक्ष सत्यजित आनंदा सोनकांबळे, सचिव अनिलराज सोनकांबळे व स्वप्निल सोनकांबळे, रूपेश सोनकांबळे, गोवींदराज सोनकांबळे व इतर सर्व विकास दादा मित्र मंडळ आणि जेष्ठ महिला उपा. राधाबाई निव्रत्ती सोनकांबळे, रमाबाई आनंदा सोनकांबळे, रमाबाई प्रल्हाद व्यवहारे, राहूबाई विठ्ठल सोनकांबळे, हरणाबाई व्यंकटी सोनकांबळे, अनिताताई गणपतराव सोनकांबळे, शोभाबाई यादव सोनकांबळे, रमा सतीश सोनकांबळे, अरुणा धम्मानंद सोनकांबळे,उगवताताई लिंगोजी सोनकांबळे, विद्याताई देवीदास सोनकांबळे, शाहूबाई गौतम सोनकांबळे व ईतर उपासक उपासीका तथा बालक बालीका हे सर्व उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ उपा. जे. एस सोनकांबळे, दुपारच्या सत्रात व्हॉईस ऑफ मीडिया दक्षिण नांदेड पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा

तरुण भारत वर्तपत्राचे पत्रकार संभाजी पांडुरंग सोनकांबळे व ड.दिक्षाराणी राहुल सोनकांबळे यांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. सदरील जयंती सोहळा उत्साहात व आनंदात पार पडावा म्हणून महिल्यातील तरुण, तरुणी, महिला मंडळ, जेष्ठ नागरिकांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त




### गोदावरी अर्बनच्या उपाध्यक्ष हेमलता देसले यांचा उत्कृष्ट उपाध्यक्ष पुरस्काराने गौरव

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित अंतर्गत सहकार उद्यमीच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व जागतिक महिलादिना निमित्त सक्षम महिला सक्षम सहकारच्या वतीने गोदावरी अर्बनच्या उपाध्यक्ष हेमलता देसले यांना उत्कृष्ट उपाध्यक्ष तर शिवधाराच्या महिला नागरी पतसंस्थेच्या सचिव नीता कटकमवार यांना उत्कृष्ट सचिवपुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार सोहळा शिर्डी येथे संपन्न झाला.या पुरस्कार सोहळ्याचे वितरण महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी सुहासिनी कोयटे,अंजली पाटील,विद्या काळे,आशा मिस्कीन,दादाराव तुपकर,अनिल येवले,भास्कर बांगर,सुरेखा लवांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी सहकार उद्यमीच्या वतीने संस्थेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांकरिता देखिल पुरस्कार प्रदान करण्यात आले.यामध्ये उत्कृष्ट उपव्यवस्थापक म्हणून संस्थेचे मुंबई शाखेतील स्वरूपाली नेरुळकर तर उत्कृष्ट सहाय्यक व्यवस्थापक म्हणून मुख्यालयाच्या राजिंदरकौर करमजीतसिंघ खैरा उत्कृष्ट सहाय्यक व्यवस्थापक म्हणून अमरावती शाखेच्या कीर्ती देशमुख,उत्कृष्ट सहाय्यक व्यवस्थापक म्हणून यवतमाळ शाखेच्या आरती किटे,सहाय्यक व्यवस्थापक म्हणून अकोला शाखेच्या वैशाली निबंधे तर उत्कृष्ट आवर्त ठेव प्रतिनिधी म्हणून ढानकी शाखेच्या आशा कलाने यांना सन्मानित करण्यात आले. सहकार उद्यमिच्या वतीने राज्यभरातील सर्व सहकारी संस्थेमध्ये पुरस्कार निवड समितीने अत्यंत काटेकोर पद्धतीने सर्व कार्याची माहिती घेऊन हे पुरस्कार जाहीर केले आहेत. या पुरस्कारा बदल संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील,अध्यक्ष राजश्री पाटील,व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर व समस्त संचालक मंडळानी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### भीम शाहिर विकास राजा सांस्कृतिक कार्यक्रमाने सांगता

**भोकर**-राष्ट्र निर्माते तथा भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात दि.२९ रोजी विदर्भातील प्रख्यात भीम शाहिर विकास राजा यांच्या भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी गुलामी का टुट गया जाल...ए है मेरे भीम का कमाल... अशी एकापेक्षा एक सरस भीमगीते सादर करून जयंती सोहळ्याची सांगता करण्यात आली. दि.२७ रोजी सार्वजनिक भीमजंयती सोहळ्याच्या निमित्ताने प्रमुख रस्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रासह मिरवणूक काढण्यात आली.त्यानंतर दि.२९ रोजी दूसऱ्या सत्रात सायंकाळी सात वाजता मोंढा प्रांगणात विदर्भातील प्रख्यात भीम शाहिर विकास राजा यांच्या भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.भीमजंयती मोहत्सवाचे अध्यक्ष जयभीम पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळ्याला पुष्प अर्पण करून सांस्कृतिक कार्यक्रमाचे ऊदघाटन केल.यावेळी भगवान दंडवे,विशाल माने, नामदेव वाघमारे, पोलिस निरीक्षक अजित कुंभार, संदिप पाटील गौड,जावेद इनामदार,साईनाथ जटलावार,पी.पी.हनवते,बाबुराव पाटील,डॉ.साईनाथ वाघमारे,बी.आर.पांचाळ, डॉ प्रज्वलीत सोनकांबळे ,दिलीप के.राव,भीमराव दूधारे,एल.ए हिंरे,गौतम कसबे, डॉ.कैलास कानिंदे, मिलिंद गायकवाड,राजेश वाघमारे, सुभाष तेले, सुधांशू कांबळे,महेंद्र कांबळे,ऊतम कसबे ,एल.पी, वारघडे, यांची ऊपस्थिती होती कार्यकम यशस्वीतेसाठी अध्यक्ष जयभीम पाटील,उपाध्यक्ष कपील कांबळे,सचिव सम्राट हिरे,साहेबराव मोरे ,संतोष डोंगरे,मनोज शिंदे,देवा हटकर,विक्रम क्षिरसागर,गौतम कसबे,कांतीलाल जोंधळे,धम्मा कदम लगळुदकर,आशोक डोगरे,सुरेश मेहनतकर ,प्रीतम डोंगरे,अविनाश गायकवाड,माधव कांबळे, नागसेन दुधारे ,राहुल जाधव,वैभव व्यवहारे,सुनील दुधारे, अतुल महाबळे , बिंबीसार पाटील मिलींद दुधारे, विक्रम डोंगरे सह बहुसंख्य समिती सोहळ्याच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### यमुनाबाई भांडे यांचे निधन

**नांदेड** - शहरातील इ स्क्वेअर परीसरातील रहीवाशी यमुनाबाई भाऊराव भांडे यांचे आज दि. ३ मे रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातु, पनतु असा मोठा परीवार आहे. यमुनाबाई भांडे यांच्या पार्थिव देहावर आज दि.३ मे रोजी सरयंकाळी ५ वाजता अंत्यस्स्कार करण्यात आले.



# खून प्रकरणातील आठ महिन्यांपासून फरार आरोपीच्या तेलंगणातून आवळल्या मुसक्या

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ०३ मे-**

माहूर तालुक्यातील मौजे रुई येथे देशमुख कुटुंबातील सख्या चुलत भावाचा दोघा भावंडांनी शेतीच्या वादातून खून केल्याची घटना गतवर्षी दि.०८ ऑगस्ट २०२४ रोजी घडली होती. या घटनेतील दोघांपैकी एका आरोपीला माहूर पोलिसांकडून तात्काळ अटक करण्यात आली होती तर एक आरोपी फरार झाला होता. पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे पोउपनि. संदीप अनेबोईनवाड यांचेसह पोलिसांनी सदरील फरार आरोपीचा शोध लावत शेजारच्या तेलंगणा राज्यातून दि.०२ मे रोजी अटक करून मुसक्या आवळल्या.माहूर पोलिसांच्या या जबरदस्त धडाकेबाज यशस्वी कामगिरीचे सर्व स्तरारातून कौतुक केले जात असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

माहूर तालुक्यातील मौजे रुई येथे दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी देशमुख कुटुंबियांच्या शेतीच्या वादावरून बैठक बोलावण्यात आली होती. यामध्ये गावातील सरपंच,उपसरपंच तंटामुक्ती अध्यक्ष,पोलीस पाटील व उपस्थित गावकऱ्यांच्या समक्ष मध्यस्थीने वाद मिटवण्यात आला होता.परंतु राहील बबलू देशमुख आणि सोहेल बबलू देशमुख यांनी वाद मिटल्यानंतर परवेज फंटुष देशमुख याला धरून गावकऱ्यांसमक्ष विळ्याने सपासप वार करून त्याचा निर्घृण खून केल्याची खळबळजनक घटना घडली होती.



पोलिसांनी या खूनाच्या घटनेतील एक आरोपी राहील बबलू देशमुख यास तातडीने अटक केली तर सोहेल बबलू देशमुख हा फरार झाला होता. तो तब्बल आठ महिन्यापासून फरार होता.दरम्यान, परवेजचे वडील फंटूश देशमुख यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांची भेट घेऊन आरोपीच्या नातलगाकडून धमक्या येत असल्याने फरार आरोपीस तातडीने अटक करण्याची मागणी केली होती. घटनेतील गांभीर्य व सद्य परिस्थिती लक्षात घेऊन फंटूश देशमुख यांच्या मागणीची दखल घेत माहूर पोलीस ठाण्याचे सपोनि. शिवप्रकाश मुळे यांनी खबऱ्यामार्फत मिळालेल्या गुप्त माहितीवरून लपून असलेल्या सोहेल देशमुख यास दि २ मे रोजी तेलंगणातील संगारेड्डी जिल्हा मणिपूर येथून स्थानिक पोलिसांच्या मदतीने सापळा रचून शिताफीने अटक केली. या दमदार यशस्वी कारवाईत सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि संदीप अनेबोईनवाड,जमादार प्रकाश गेडाम ,पोकाँ. डी.डी. खंडाळे यांनी मोलाची कामगिरी बजावली.

# महात्मा बसवेश्वरांचे कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे : आ. भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०३ मे-**

महात्मा बसवेश्वर हे वीरशैव धर्माचे पुनर्जन करणारी महान विभूती होते.कर्नाटक ही त्याची कर्मभूमी त्यांनी धर्म ,समाज तत्त्वज्ञान ,वांग्मय ,राजकारण इत्यादी क्षेत्रात केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे.बसवेश्वर हे मध्ययुगातील भारताच्या धार्मिक सांस्कृतिक साहित्य, शैक्षणिक ,राजकीय व समाज जीवनातील ज्येष्ठ समाजप्रतिमत्त्ववादी युगपुरुष होते.समाजसुधारकाचे यादीतही त्यांचे पहिले स्थान आहे.म्हणून त्यांना आद्य भारतीय समाज सुधारक क्रांती योगी व युगपुरुष मानले जाते असे आ. भीमराव केराम यांचे प्रतिपादन केले.



किनवट येथील महात्मा बसवेश्वर चौकात बसवेश्वर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी प्राध्यापक मिश्रा ज्येष्ठ समाजसेवक शिवराज आप्पा राघू मामा यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर कार्यावर प्रकाश टाकला .यावेळी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आमदार भीमराव केराम सुधाकर दादा भोयर माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार माजी उपनगराध्यक्ष सुरज सातुरवार, भाजप शहराध्यक्ष स्वागत आयननिवार , भाजपा किनवट तालुका अध्यक्ष उमाकांत कराळे पाटील, सतीश नेमाने वार ,बाळकृष्ण कदम ,अमन कुंडगीर यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद सोनटक्के यांनी केले.तर आभार शिवराज राघू मामा यांनी मानले .या कार्यक्रम सतीश बिराजदार पत्रकार अनिल भंडारे ,संजय बिराजदार यांच्या पुढाकाराने संपन्न झाला.या कार्यक्रमास राजू वडे ,संजय बिराजदार सर विश्वनाथ आप्पा भंडारे ,डॉ.अमोल तोंडारे, विश्वनाथ दुर्गेवार ,निळकंठ भंडारे, गजानन शिवणकर अरुण भंडारे, ठोंबरे आप्पा, बाळू व्यवहारे, चंद्रकांत भंडारे, गणपत आप्पा भंडारे, विजय महाजन ,किशन राखोडे, पत्रकार दत्ता जायभाये ,माधव शेळगाव,चंद्रकांत भंडारे नागेश मेंगा ,मारुती साकोळे, शत्रुघन भालके ,श्याम बेलोरे अनिल सलगरे ,महेश भंडारे वैजनाथ होळकुंदे, सत्यनारायण टेलर, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. यावेळी महाप्रसादाच्या आयोजन करण्यात आले होते.

याबरोबरच तालुक्यातील मौजे आंदबोरी येथेही लिंगायत समाजाच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी शिवराज राघू मामा, सतीश बिराजदार ,आनंद सोनटक्के, अनिल भंडारे, संजय बिराजदार ,राजू वडे तसेचअंध बोरीची सरपंच संजू अंभोरे साहेबराव पाटील, बालाजी कुरे ,परमेश्वर साखरे ,इंदल महाराज ,विश्वास साखरे, नामदेव खोकले, जगु करपुडे महादू लहाने ,पप्पू गोरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मुदखेड येथे भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ०३ मे-**

मुदखेड शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी भगवान परशुराम यांचे तैलचित्राचे विधिवत पूजन मुदखेडचे माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी यांचे हस्ते करण्यात आले.

शहरातील प्रसिद्ध कालेजी देवी मंदिरात भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला यावेळी ब्राह्मण समाजातील प्रतिष्ठित गोविंदराव चौधरी,

श्रीधरराव जोशी,उदय जोशी, श्रीकांत देशमुख,अमोल कुलकर्णी, जितेंद्र शर्मा, प्रथमेश समुंदर, सुशांत भोसकर सह महिला वर्गाची संख्या बऱ्यापैकी होती प्रमुख पाहुणे म्हणून अमृत संस्थेचे अनिल डोईफोडे व संतोष कुलकर्णी यांनी उपस्थित ब्रह्मवृंदांना मार्गदर्शन करताना आज ब्राह्मण समाज हा कसल्याही प्रकारचा गाजावाजा करीत नाही करता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तळमळत असतो देव देश धर्म यांचे आचरण तो करत असतो आजघडीला ब्राह्मण समाज हा मोठमोठ्या व्यवसायात फार क्वचित असून विविध समाजातील समाजबांधवांचा विकासाचा स्तर वाढावा यासाठी राज्य शासनाचे वतीने सुशिक्षित तरुण, व्यावसायिकांना व होतकरू महिलांसाठी महामंडळ स्थापन करुन कर्जाची व्यवस्था केली व स्तर सुधारण्याचा प्रयत्न केला त्याच धर्तीवर राज्य शासनाचे वतीने ब्राह्मण समाजाचा विकास व्हावा या उद्देशाने एक महामंडळ स्थापन करुन कर्जाची व्यवस्था करण्यात आली असून सुशिक्षित तरुण, व्यावसायिकांना, महिलांसाठी योजना सुरू करण्यात आल्या असल्याची माहिती यावेळी दिली माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी यांनी अनुभव कथन करताना मी ब्राह्मण समाजाचा एक कार्यकर्ता असून सर्वच समाजांतील लोकांसोबत काम केलेले असल्यामुळे मला सर्वात जास्त काळ नगराध्यक्ष राहण्याचा मान ही मिळाला असल्याची माहिती दिली तसेच आतापर्यंत मी माझ्या परिने होईल तेवढी मदत गरजूंना केलेली असून ब्राह्मण समाजातील नागरिक, महिला, व्यावसायिक आदींनी मदतीची गरज असल्यास मदत करून त्या समाज बांधवास समाजात उभे करण्यासाठी मदत करण्याचे वचनही दिले.अमृत संस्था पुणे महाराष्ट्र राज्य यांचे वतीने मुलींसाठी रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त करण्यात आले होते त्यात पहिला क्रमांक दिव्या मनोज शर्मा यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

# नरसी पोलीस चौकीच्या कामाची जिल्हा पोलीस अधीक्षकांनी केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नरसी दि. ०३ मे-**

नरसी येथील पोलीस चौकीच्या आवारात बांधण्यात येत असलेल्या नूतन इमारतीची पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आज दि. २ मे रोजी शुक्रवारी पाहणी केली. लोक सहभागातून सुरु असलेल्या या उपक्रमा बद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांच्या कार्य कुशलतेचे तोंड भरून कौतुकही केले नांदेड जिल्ह्यातील प्रमुख चौरस्त्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नरसी तालुका नायगाव येथील फाट्यावर रामतीर्थ पोलिस ठाण्याची पोलीस चौकी कार्यरत



आहे. या इमारतीचे देखील काही वर्षांपूर्वी सपोनि अशोक जाधव यांनी देखील लोक सहभागातूनच बांधकाम केले होते.दरम्यान प्रशासकीय व विविध बंदोबस्त कामी येणारे वरिष्ठ अधिकारी तसेच इतर कार्यालयीन कामकाजासाठी येथे अजून एका सुसज्ज इमारतीची फार गरज होती. तीच गरज ओळखून चौकीच्या आवारात उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेत स.पो.नि. श्रीधर जगताप यांनी लोक सहभागातून नूतन इमारत निर्मिती साठी उल्लेखनीय पुढाकार घेतला आहे सध्या या नूतन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून दि.२ में रोजी शुक्रवारी हैद्राबादहुन नांदेड कडे जात असताना पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी अचानकपणे नरसी पोलीस चौकीस भेट दिली व या नूतन उपक्रमाची पाहणी केली. या लोकोपयोगी कार्याबद्दल सपोनि श्रीधर जगताप यांच्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुकही केले.यावेळी नायगांव येथील परिवक्षाधीन पोलीस उपाधीक्षक किरण पोपळघाट, पोलीस निरिक्षक सुभाषचंद्र मार्कड, सपोनि श्रीधर जगताप, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांची उपस्थिती होती.

येत्या काही दिवसात विशेष पोलीस उपमहानिरीक्षक नांदेड यांच्या हस्ते या नूतन इमारतीचे लवकरच लोकार्पण करण्यात येणार असून यावेळी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार उपस्थित राहणार असल्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी सांगितले आहे. यावेळी रामतीर्थ व नायगाव ठाण्याचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# परळीत ब्राह्मण सभा आयोजित शानदार सोहळ्यात २० बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार!



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

धर्माचरणाचे संस्कार हे उपनयनासारख्या संस्कारातून होतात. धर्माचरण व नैष्ठिक आचारासाठी उपनयन संस्कार गरजेचा असल्याचे प.पु.मकरंद महाराज यांनी सांगितले. धर्मशील समाज निर्मितीसाठी उपनयन संस्कार आवश्यक असल्याचे भागवतमर्मज्ञ ह. भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांनी सांगितले. तसेच धर्मसंस्कार हाच जीवनाचा पाया असतो असे ना.पंकजाताई मुंडे यांनी तर परळीत अविरत ४५ वर्षांचा ब्राह्मण सभेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे आ.धनंजय मुंडे यांनी सांगितले.ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वैजनाथ आयोजित शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २० बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने आयोजित ४५ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आज २ मे रोजी शानदार व वैभवी स्वरूपात संपन्न झाला. शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २० बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले. सकाळी १०.३० वा. प्रवचनमंडप वैद्यनाथ मंदिर परळी वै. येथे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात व विधीपुर्वक हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचे पौरोहित्य मनोहर देव जोशी व ब्रह्मवृंदांनी केले.या वेळी दत्तधाम परभणीचे पिठाधिपती प.पु. मकरंद महाराज, प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांचे अशिर्वचन झाले.



# माजलगाव उजव्या कालव्यातून परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना २४ तासाच्या आत पाणी सोडण्याच्या धनंजय मुंडे यांच्या सूचना

**पालकमंत्री अजितदादा पवार ते कार्यकारी अभियंता; धनंजय मुंडे यांनी फिरवली सूत्रे**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना माजलगाव उजव्या कालव्यातून २४ तासांच्या आत पाणी सोडण्यात यावे तसेच यापुढील आवर्तन वेळेतच उपलब्ध करून द्यावे अशा सूचना आज माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना केले आहेत.

धनंजय मुंडे यांनी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री इनामदार यांच्याशी भेटून चर्चा केली. त्यानंतर तातडीने जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करून अधीक्षक अभियंता श्रीमती जगताप यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क करून २४ तासांच्या आत परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.



परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना माजलगाव उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यास उशीर झाल्यामुळे उसासह उन्हाळी पिके अक्षरशः करपू लागली आहेत, याची कल्पना मिळताच धनंजय मुंडे यांनी कार्यकारी अभियंता श्री इनामदार यांना बोलावून घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्याचबरोबर पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यापासून ते अधीक्षक अभियंता पर्यंत सूत्र फिरवली. त्यामुळे आता परळी तालुक्यातील शेतकऱ्यांना माजलगाव उजव्या कालव्यातून पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात लोकशाहीचा पाया रचला : अश्विन मोगरकर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात लोकशाहीचा पाया रचला असल्याचे प्रतिपादन अश्विन मोगरकर यांनी महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

जगतज्योति महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन गणेशपार येथील सावळाराम मंदिरात करण्यात आले होते. यावेळी बोलताना अश्विन मोगरकर यांनी महात्मा बसवेश्वरांच्या महान कार्यास उजाळा दिला. बाराव्या शतकात राजेशाहीच्या कालखंडात लोकशाही पद्धतीने कारभार चालवणारे महात्मा बसवेश्वर यांनी जगभरातील लोकशाहीचा पाया रचला होता. जयंती उत्सवाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. प्रवीण फुटके यांनी सांगितले की, जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंटप नावाचे एक व्यासपीठ तयार केले, जिथे वेगवेगळ्या जाती-धर्माचे लोक, महिला प्रतिनिधी एकत्र येऊन चर्चा करू शकत होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन स्वामी व आभार प्रदर्शन विजय जोशी यांनी केले. यावेळी तरुण भारत चे पत्रकार श्रीराम लांडगे, जेष्ठ नागरिक प्रभाकरराव देशमुख, भगवानअप्पा हालगे, सुरेश संघई, गणेश सावजी, गजाननअप्पा चौंडे, पद्माकर शहाणे, दिपक कुसुमकर, विरकुमार स्वामी, बाळकृष्ण फुले, सत्यनारायण मानधने, गणेश कोडी, गणेश दहातोंडे, गणेश नाईकवाडे, रमेश पवार उपस्थित होते.

# प्रा.अब्दुल अजीज अन्सारी यांचा सेवागौरव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ मे**

म.शि.प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक अब्दुल अजीज अन्सारी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने सेवागौरव करण्यात आला. यावेळी म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, विजयकुमार सोळंके, ऍड.बी .आर. डक,सत्यप्रकाश रुद्रवार ,डॉ सुनील गरड यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रा. अन्सारी यांच्या सेवागौरव निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. के सानप, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. लतीफ पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की प्रा. अन्सारी यांची ओळख विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आहे.त्यांनी प्रमाणितपणे सेवा केली अध्यापन व प्रशासकीय कामातील त्यांच्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला झाला. त्यांनी महाविद्यालयात काम करत असताना नोकरी न समजता सेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडले. यावेळी सेवपूर्ती निमित्त बोलताना प्रा. अन्सारी म्हणाले की, म. शि. प्र.मंडळात शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो. ग्रामीण भागातील विदयार्थी केंद्रबिंदु ठेवून मी माझी सेवा प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी उपप्राचार्य प्रकाश गवते, प्रा. संजय बागुल,प्रा लतीफ पठाण,प्रा.राजेंद्र जाधव, प्रा.जितेंद्र ठोंबरे, प्रा बबन उदावंत, प्रा. विकास शिंगणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रा.अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# आज परळीत जे.के.कन्स्ट्रक्शनच्या वतीने मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न होणार विवाह सोहळा**
**जाफर खान, हाजी राजा खान यांची माहिती**





**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

बांधकाम क्षेत्रात नामांकित असलेल्या येथील जे. के. कन्स्ट्रक्शनच्या वतीने आज दिनांक ४ मे रोजी मुस्लिम धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मुस्लिम धर्मीय सामुहिक विवाह सोहळा आज थाटात संपन्न होणार असून या सामूहिक विवाह सोहळ्याचा गरजवंत जोडप्यांनी लाभ घ्यावा तसेच या नेत्र दीपक विवाह सोहळ्याचे साक्षीदार होऊन वधूवरांना शुभशीर्वाद देण्यासाठी सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान व हाजी राजा खान यांनी केले आहे.

याबाबत माहिती अशी की, बांधकाम क्षेत्रात नामांकित असलेल्या येथील जे.के. कन्स्ट्रक्शन च्या वतीने गत काही वर्षापासून सामाजिक दायित्व निभावण्याच्या दृष्टीने मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन परळी मध्ये करण्यात येते. यावर्षी देखील आज ४ मे रविवार रोजी जे. के. फंक्शन हॉल, मलकापूर रोड येथे सकाळी ११ वाजता हा मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात आणि उत्साहात संपन्न होणार आहे. समाजातील प्रतिष्ठा आणि रूढी परंपरा जपण्यासाठी अनेक गरीब कुटुंब कर्ज काढून लग्न करतात. यामध्ये समाजातील कुटुंबांचा विनाकारण अनाठाई तथा अनावश्यक खर्च होतो. समाजातील आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी गरीब कुटुंब प्रसंगी कर्जबाजारी होतात. यामुळेच मुस्लिम समाजातील गरजवंतांसाठी जे. के कन्स्ट्रक्शन च्या वतीने होतकरू आणि गरजू कुटुंबासाठी मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे जे.के. कन्स्ट्रक्शन च्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

आज दिनांक ४ मे रविवार रोजी येथील मलकापूर रोडवरती असणाऱ्या जे.के. फंक्शन हॉल या ठिकाणी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत जे.के. कन्स्ट्रक्शन आयोजित मुस्लिम धर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न होत असून या विवाह सोहळ्याचा मुस्लिम समाजातील जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा तसेच या नेत्रदीपक विवाह सोहळ्याचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तथा नागरिकांनी साक्षीदार होऊन नवदांपत्यास शुभाशीर्वाद द्यावेत असे आवाहन जाफर खान उस्मान खान, हाजी राजा खान उस्मान खान, उमर खान उस्मान खान, वाहेद खान जाफर खान, शाहेद खान राजा खान, शेख मझहरूद्दिन अलीमोदिन, जफर खान जाफर खान, नदीम खान जाफर खान, हाफेज तारेक खान एजाज खान, फेरोज खान उमर खान, फाजेब खान उमर खान, तौफिक खान एजाज खान यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# साबला ग्रामपंचायतच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त महिलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ मे**

तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त प्रथम राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , चेरमन उत्तमराव काकडे , मुख्याध्यापक धनराज धाट - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , साबला . अध्यक्ष शंकर नाईकनवरे - शालेय व्यवस्थापन समिती , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , साबला . सहशिक्षिका श्रीमती वंदना फाटे , अंगणवाडी शिक्षिका सुनंदा काकडे , अंगणवाडी मदतनिस श्रीमती काशिबाई राऊत साबला , आरोग्य सेविका श्रीमती वर्षा काकडे , नवनिर्वाचित अंगणवाडी मदतनिस श्रीमती शोभा मुळे , ग्रामपंचायात कर्मचारी गुलाब मुळे , विश्वनाथ नाईकनवरे यांच्या हस्ते राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले .

महिलांना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग , महाराष्ट्र राज्य . यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन - २०२४ / २५ हा पुरस्कार ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सामाजिक , राजकिय , धार्मिक , शैक्षणिक , सांस्कृतिक क्षेत्रात उत्लेखनिय काम करणाऱ्या महिलांना ट्रॉफी , प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले . त्यामध्ये श्रीमती आश्रुबाई श्रीमंत काकडे , श्रीमती पारुबाई श्रीमंत नाईकनवरे या महिलांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

श्रीमती आश्रुबाई श्रीमंत काकडे - यांच्या बाबतीत थोडक्यात माहिती अशी आहे . की त्या स्वतः ग्रामपंचायत सदस्य साबला . म्हणून राजकारणात सक्रिय आहेत . तसेच त्यांची दोन्हीही मुलं शिक्षण घेऊन वेगवेळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत . त्यांचे थोरले चिरंजीव हे पुणे येथील पिंपरी चिंचवड येथे स्वतःचा फ्रुटचा व्यवसाय करतात . तर धाकले चिरंजीव हे मुंबई येथे राष्ट्रीय कृत बँकेत नोकरी करतात. त्याचप्रमाणे श्रीमती पारूबाई श्रीमंत नाईकनवरे यांचे पती देखील दोन वेळेस ग्रामपंचायत सदस्य म्हणून तर एक वेळेस सेवा सहकारी सोसायटी संचालक म्हणून त्यांनीही राजकीय क्षेत्रात काम केले आहे . त्यांच्याही मुलांनी शिक्षण घेऊन त्यांचीही दोन्ही मुलं हे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत . त्यामध्ये त्यांचे थोरले चिरंजीव हे शिक्षण क्षेत्रात माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत . ते शिक्षण क्षेत्रात ज्ञानदान करण्याचे काम करतात . तर धाकले चिरंजीव हे पुणे येथील कंपनी मध्ये चांगल्या प्रकारच्या जॉब चे ते काम करतात. म्हणून या दोन्हीही महिलांची निवड करून त्यांचा सन्मान उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे , समाजसेवक नरहरी काकडे , ग्रामपंचायत अधिकारी तानाजी शिंपले , पोपट काकडे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले , यावेळी राहुल मुळे , श्रीमंत नाईकनवरे , उमाशंकर शिंदे , श्रीमंत काकडे , राजेभाऊ काकडे , जालींदर मुळे , लक्ष्मण काकडे , उद्धव नाईकनवरे , माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे , भारत काकडे , माजी व्हाईस चेरमन आत्माराम काकडे , मेजर अशोक काकडे , चत्रभुज मुळे , रामचंद्र काकडे , सावताराम नाईकनवरे , अंगद काकडे , रामदास मुळे , पवन सरवदे , अंकुश काकडे , रामभाऊ काकडे , अनंत नाईकनवरे , धनेश्वर पांचाळ यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते.

# खते बी बियाणे कीटकनाशके कायदा करण्यात महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार नापास : वसंत मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

बोगस खते बी बियाणे कीटकनाशके औषधी कृषी निष्ठा उत्पादक व विक्रेते दुकानदारा मार्फत शेतकऱ्यांना विक्री करून आर्थिक व्यवहाराचे लागे बंद असलेले सोनेरी टोळक्याने धुमाकूळ घातलेला आसुन खाजगी कंपनीच्या दबावापोटी खते बियाने कीटकनाशके कायदा करण्यास महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार अकार्यक्षम असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.

तिन्ही माजी कृषिमंत्र्यांनी व कृषी खात्याच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अनेक योजनेमध्ये टक्केवारीचा गोंधळ घातल्यामुळे शेतकऱ्याला सर्व सवलतीचा लाभ वेळेनुसार मिळत नाहीत. खरीप पेरणीच्या अगोदरच मध्यप्रदेश गुजरात मधून बोगस बियाणे महाराष्ट्रात येण्यास सुरुवात झालेली आहे. तरीही कृषी मंत्री कार्यालयाकडून कारवाईच्या आदेश देण्यात आलेले नाहीत. बोगस खते बियाणे कीटकनाशकना आळा घालण्यासाठी नवीन कृषी कायदा करताना शेतकऱ्याच्या आर्थिक नुकसान देण्यास नियमानुसार प्राधान्याने कायद्यात तरतूद करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

# कायकावे कैलास या तत्वावर जीवन जगण्याचा संदेश महात्मा बसवेश्वरांनी दिला : डॉ ओम प्रकाश शेट्टे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ मे**

महात्मा बसवेश्वर जयंती निमित परळी वैजनाथ येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महाराष्ट्र कक्ष प्रमुख डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी संत गुरलिंग स्वामी मठ बेलवाडी येथे महात्मा बसवेश्वराच्या प्रतिमेचे पूजन केले या वेळी बोलताना ते म्हणाले महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यामुळे समाजावर अनेक सकारात्मक बदल झाले. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि रूढी-परंपरांविरुद्ध आवाज उठवला, ज्यामुळे समाजात समानता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित झाला. त्यांनी 'कायकावे कैलास' या तत्त्वावर आधारित जीवन जगण्याचा संदेश दिला, ज्यामुळे लोकांना कामाला महत्त्व देण्यास आणि आत्मनिर्भर होण्यास प्रोत्साहन मिळालं. यावेळी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची आयुष्यमान भारतात प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महाराष्ट्र प्रमुख निवड झाल्या संत गुरुलिंग स्वामी मंदिर बेलवाडी तर्फे सचिव अँड गिरीश चौधरी यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळी महाराष्ट्र वीरशेव लिंगायत सभा चे तालुका अध्यक्ष महादेव ईटके, जेष्ठ पत्रकार आत्मलिंग शेटे, वीरशैव विकास प्रतिष्ठानचे सहसचिव विकास हालगे, शिवसेनेचे माजी नगरसेवक रमेश चौंडे, मुद्रा लोन योजना बीड जिल्हा सदस्य सुशील हरंगुळे, शिवसेना नेते सचिन स्वामी, लहू हालगे, गणेश स्वामी आदि समाजा बांधव बहुसंख्य उपस्थित होते.

# शिरूर कासार येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ मे**

महसूल व वन विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील नागरिकांची कामे जलद गतीने व्हावीत, महसूल विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग असून शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनांची अंमलबजावणी तसेच शेतकऱ्याशी संबंधित असणारे जिव्हाळ्याचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत , तसेच त्या त्या भागातील शेतकऱ्यांच्या , गोरगरिबांच्या , विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा वेळेवर निपटारा व्हावा , यासाठी प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्याचे शासनाचे निर्देश आहेत.बीड जिल्ह्यात महसूल प्रशासन पारदर्शक व गतिमान व्हावे , जनमानसात महसूल विभागाची प्रतिमा उंचावी यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुराव्यातून व बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार येथे २ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराज व अभियान राबविण्यात आले . शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा असलेला प्रश्न म्हणजे शेत रस्ते . उपस्थित शेतकऱ्यांना गावनकाशावरील शेतरस्ते , वहिवाटीचे शेतरस्ते , ज्या शेतकऱ्यांना पूर्वी रस्ता उपलब्ध नाही त्यांना सर्वे नंबर बांधावरून उपलब्ध करून दिले जाणारे रस्ते , याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले . यावेळी विहित नमुन्यांमध्ये ७ अर्ज स्वीकारण्यात आले.

